स्थळ प्रत
सं. ....... नं. .......
ठाणे.

# सुलभ अभंगवाणी.

म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. नं. ८३०
सन १९३५

तुकाराम



अमृतरसाची क्षितिवर साची। सिंधुची ज्याची वाणी।
डोलविते चि जडा अजडाही । प्रभुच्या वेणूवाणी ॥

*   *

ते, खलहृदया जेंवि बाण रामाचे ।
—मोरोपंत

REFBK-0005624

महादेव गोविंद मोडक.

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
क्र. काव्य. ११२
ता.
ठाणे.

मराठी ग्रंथ संग्रहालय
नोंद क्र.
ठाणे.

# सुलभ अभंगवाणी

तुका म्हणे मज धाडिले निरोपा । मार्ग हा सोपा सुखरूप ॥

५६२४

संग्रहकार

महादेव गोविंद मोडक, एम्. ए., एस्. टी. सी. डी.

ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ऑफिसर, स्कूलबोर्ड, लो. अ.

म्युनिसिपालिटी, अहमदनगर

REFBK-0005624

प्रथम आवृत्ति

१९३५

किं. ५ आणे

प्रकाशक
महादेव गोविंद मोडक,
एम्. ए. एस्., टी. सी. डी.
ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ऑफिसर,
स्कूलबोर्ड,
लो. अ. म्युनिसिपालिटी, अहमदनगर.

मुद्रक
गणेश काशिनाथ गोखले,
मॅनेजिंग डायरेक्टर, श्रीगणेश
प्रिंटिंग वर्क्स, ४९५-४९६
शनिवार, पुणे २.

स्थळ प्रत
सं. ओं ४५
ता. ५/३
डा. ओं.

# अनुक्रमणिका

१ ईश्वर. ... ... ... ... ... १
२ साधन. ... ... ... ... ... ४
नामसंकीर्तन ( ४ ) सद्गुण ( ६ ) मनोनिग्रह (१०) ...
भाव (११) भक्ति (१४) भक्त (१५). ... ...
३ साध्य व फळ. ... ... ... ... १८
सज्जन (१८) ईश्वर व भक्त (२०) फळ (२१) ...
४ साधनाबद्दल अज्ञान. ... ... ... २४
शब्दज्ञान (२४) जाणीव (२५) बाह्यसोंग (२६) ...
अज्ञानी (२९) दुर्जन (३२) अयोग्य गुरु (३५) ...
५ उपदेश. ... ... ... ... ... ३७
विवेक वैराग्य (३७) व्यवहारबोध (४०) ... ...
६ आश्वासन व समाधान. ... ... ... ४८
७ ईशस्तुति. ... ... ... ... ५१
८ प्रार्थना. ... ... ... ... ... ५८
९ अनुभवाचे उद्गार. ... ... ... ... ७०

# सुलभ अभंगवाणी या पुस्तकाबद्दल खुलासा

अभंगवाणी या पुस्तकांतील अभंग तुकारामांची धर्मविषयक विचारसरणी सुसंगत रीतीनें कळावी या उद्देशानें निवडले. त्यांतील सर्व अभंगांची भाषा व त्यांतील विचार सारखेच सुलभ नाहींत. म्हणून साधारणतः १४ वर्षांच्या पुढच्या मुलांसही समजतील असे सोपे अभंग मूळ पुस्तकांतून या पुस्तकांत घेतले आहेत. मूळ पुस्तकाचीं अनेक अंगें असल्यामुळें त्याची किंमत अधिक झाली. या विषयाचीं पुस्तकें घेण्यास फार पैसे देण्यास लोकांस परवडेलच असें नाहीं अशी शंका पुढे आल्यामुळें मजकूर व किंमत या दोन्ही दृष्टींनीं सुलभ अशी ही प्रत तयार केली आहे. तिचा आबाल-वृद्धांनीं उपयोग करावा व याही पुस्तकाबद्दल ज्या सूचना करावयाच्या असतील त्या संकोच न ठेवतां कराव्या ही विनंती. तुकारामांचे कांहीं प्रेमळ अभंग या पुस्तकांत नाहींत असें पाहून हिरमुष्टी होऊं नये, 'तुकोबांचें प्रेमळ अभंग' हें पुस्तक लेखकानें प्रसिद्ध केलें आहे तें पहावें. त्याची किंमत अवघी २ आणे आहे. शब्दांचे अर्थ समजले नाहींत तर 'अभंगवाणी' या मूळ पुस्तकास जोडलेल्या कोशांत पहावे.

या पुस्तकाच्या वाचनानें **'अभंगवाणी'** हें पुस्तक विकत घ्यावेसें वाटेल अशी उमेद आहे. त्यांत तुकारामांचें चरित्र व तुकारामांच्या उपदेशाचें तात्पर्य याबद्दल ६४ पानें मजकूर असून अभंग २८१ आहेत. त्यांचा अर्थही दिला आहे.

**अभंगवाणी** या मूळ पुस्तकांत तुकारामांच्या इतर अभंगांतील उत्तम वचनें २० पानांत उत्तम क्रम लावून वाचण्यास सुगम अशीं छापिलीं आहेत. तीं वाचकांस फार आवडतील अशी आशा आहे. त्यामुळें तुकारामांचा उपदेश मनांत चांगलाच बिंबेल.

**म. गो. मोडक.**

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे स्थळ प्रत
नं. ३१०१ नं. ५५
ता. ४/५/५८
ठाणे
नोंद नं. ६२८
५६२४

# सुलभ अभंगवाणी

## तुकाराम

### १ ईश्वर

( १ ) देवाला भाव असणारे दीन भक्त फार आवडतात.

**कृपावंत किती । दीन बहु आवडती ॥**
त्यांचा भार वाहे माथां । करी योगक्षेमचिंता ॥
भुलों नेदी वाट । करीं धरूनि दावी नीट ॥
तुका म्हणे जीवें । अनुसरतां एका भावें ॥

भुलों नेदी—चुकूं देत नाहीं. अनुसरतां—मागें जातां.

देव कृपावंत असल्यामुळें त्यास गरीब ( संकटग्रस्त ) भक्त फार आवडतात. त्यांच्या संकटांचा भार तो आपल्या डोक्यावर घेतो व त्यांच्या योगक्षेमाची चिंता करतो. तो त्यांची धर्ममार्गाची वाट चुकूं देत नाहीं. हातांत धरून तो त्यास वाटेनें नेतो. मात्र मनापासून एकनिष्ठ भावानें त्याच्यामागें गेलें पाहिजे.

---

( २ ) मोल न देतां उत्तम औषध देणारा देवासारखा दुसरा वैद्य नाहीं.

वैद्य एक पंढरिराव। अंतर्भाव तो जाणे।
रोगाऐशा द्याव्या वल्ली। जाणे जाली वाधा ते॥
नेदी रुका वेचों मोल। पाहे बोल प्रीतीचे॥
तुका म्हणे दयावंता। सदा चिंता दीनांची॥

अंतर्भाव—आंतील स्थिति. वल्ली—औषध. रुका—पैसा.

या संसारांत देव हाच एक खरा वैद्य आहे. त्यास आंतील भावना समजतात. कोणता रोग झाला आहे तें ओळखून त्यास योग्य तें औषध देण्याचें काम त्यासच समजतें. त्याच्या औषधाला पैसा खर्च करावा लागत नाहीं. प्रीतीच्या बोलानें औषध मिळूं शकतें. कारण देव दयावंत असल्यामुळें त्याला नेहमीं गरीबांची काळजी आहे.

---

( ३ ) ध्रुव, प्रल्हाद, गोपाळ इत्यादि भक्त जाणते नसूनही देवाचे आवडते झाले.

**तयासी नेणतीं बहु आवडती। होय जयां चित्तीं एक भाव॥**
उपमन्य धुरु हे काय जाणती। प्रल्हादाच्या चित्तीं नारायण॥
कोळी भिल्ल पशु श्वापदें अपारें। कृपेच्या सागरें तारियेलीं॥
काय तीं गोपाळें चांगलीं शहाणीं। तयां चक्रपाणी जेवी सवें॥
तुका म्हणे भोळा भाविक हा देव। आम्ही त्याचे पाय धरुनी ठेलों॥

नेणतीं—अज्ञानी. भाविक—भावाला मिळणारा.

ज्यांच्या मनांत देवाविषयीं एकनिष्ठ भाव असतो, असे अज्ञानी भक्त देवाला फार आवडतात. उपमन्यु, ध्रुव, प्रल्हाद हे असे किती ज्ञानी होते! मात्र त्यांच्या चित्तांत नारायण होता. कोळी, भिल्ल, पशु इत्यादि अनेक प्राण्यांना देवानें आपल्या कृपेनें तारलें आहे. कृष्णाबरोबर खेळणारे गोपाळ फार शहाणे होते का! शहाणे नव्हते तरी त्यांच्याबरोबर कृष्ण जेवीत होता. असा हा आमचा देव भावाचा भोक्ता, अज्ञानी लोकांची आवड

बाळगिणारा, साधाभोळा व भावाचें चीज करणारा आहे. म्हणून त्याचेच पाय धरून आम्ही बसलों आहों.

---

( ४ ) देव प्रेमाचा भुकेला असल्यामुळें त्यानें भिल्लणीचीं उष्टीं बोरें व सुदामदेवाचे कोरडे पोहे खाल्ले.

ऐका महिमा आवडीचीं । बोरें खाय भिलटीचीं ॥
थोर प्रेमाचा भुकेला । हा चि दुष्काळ तयाला ॥
पव्हे सुदामदेवाचे । फके मारी कोरडे च ॥
न म्हणे उच्छिष्ट अथवा थोडें । तुका म्हणे भक्तीपुढें ॥

देवाच्या प्रेमाचा महिमा ऐका. त्यानें भिल्लीणीच्या आवडीचीं बोरें भक्तीनें दिलेलीं होतीं म्हणून खाल्लीं. कारण त्याला प्रेमाची भूक फार आहे. त्याला खरें प्रेमच सहसा भेटत नाहीं. सुदामदेवानें दिलेल्या कोरड्या पोह्यांचे फाके त्यानें मारले. भिल्लीणीचीं बोरें उष्टीं किंवा सुदामदेवाचे पोहे थोडे व कोरडे हा विचार भक्तीच्या प्रेमामुळें देवानें मनांत आणला नाहीं.

---

( ५ ) अनेक भक्तांनीं एके वेळीं त्रास दिला तरी तो देवाला सहन होतो. भक्ताची भक्ति थोडी असली तरी उलट तो त्यास पुष्कळ देतो.

देव दयाळ देव दयाळ । साहे कोल्हाळ बहुतांचा ॥
देव उदार देव उदार । थोड्यासाटीं फार देऊं जाणे ॥
देव चांगला देव चांगला । तुका लागला चरणीं ॥

कोल्हाळ—ओरड, त्रास.

देव दयाळू आहे. इतका कीं, अनेकांचें ओरडीचें मागणें येऊन त्रास झाला तरी तो सहन करितो. देव इतका उदार आहे कीं, भक्तांनीं थोडी सेवा केली तरी तो तिचा पुष्कळ मोबदला देतो. देव इतका चांगला आहे कीं मलासुद्धां त्याच्या चरणांजवळ जातां आलें.

---

## २ साधन

—:०:—

### नामसंकीर्तन

( ६ ) बाळाच्या जन्माबरोबर त्याच्या दुधाची योजना करणें व हिंवाळ्यांत वठलेल्या झाडांस जीवन देणें अशा योजना करणाऱ्या देवास आठवा.

**कां रे नाठविसी कृपाळु देवासी । पोसितो जनासि एकला तो ॥**
**बाळा दूधा कोण करीते उत्पत्ति । वाढवी श्रीपती स्वयें दोन्ही ॥**
**फुटती तरुवर उष्णकाळमासीं । जीवन तयासी कोण घाली ॥**
**तेणें तुझी काय नाहीं केली चिंता । राहे त्या अनंता आठवूनि ॥**
**तुका म्हणे ज्याचें नाम विश्वंभर । त्याचें निरंतर ध्यान करीं ॥**

**जीवन**—पाणी.

सर्व जगाला आपल्या एकट्याच्या सामर्थ्यानें जो पोसतो त्या कृपाळू देवाला तूं कां आठवीत नाहींस ? तान्ह्या मुलाकरितां दुधाची योजना कोण करितो ? देवच स्वतः बालक व त्यास दूध, ही योजना करितो. उन्हाळ्यांत मोठ्या झाडांना पालवी फुटते. त्यांना कोणी पाणी का घालीत असतें ? देवाच्या योजनेमुळेंच त्यांना पालवी फुटते. त्या देवाला तुझ्या कल्याणाची काळजी नाहीं का ? त्याचें चिंतन करून तूं आपला नित्यक्रम चिंता न करितां पार पाड. त्याचें नांवच मुळीं विश्वाची काळजी करणारा असें आहे. त्याला नेहमीं स्मरणांत ठेव.

---

( ७ ) एकचित्तानें देवास आळविणें हें सर्वांत सोपें साधन आहे.

**नामसंकीर्तन साधन पैं सोपें । जळतील पापें जन्मांतरीचीं ॥**
**न लगे सायास जावें वनांतरा । सुखें येतो घरा नारायण ॥**
**ठायींच बैसोनि करा एकचित्त । आवडी अनंत आळवावा ॥**
**रामकृष्ण हरि विठ्ठल केशवा मंत्र हा जपावा सर्वकाळ ॥**

ग्रंथ नं. १५२१

त्याविण असता आणीक साधन । वाहातसे आण विठोबाची ॥
तुका म्हणे सोपें आहे सर्वांहूनि । शाहाणा तो धणी घेतो येथें ॥

धणी — समाधान.

नामसंकीर्तन हें सोपें साधन आहे. सोपें असलें तरी अनेक जन्मींचीं पापें या साधनानें जळतात. इतर साधनांप्रमाणें यांत कष्ट नाहींत. रानां-वनांतही जावें लागत नाहीं. या साधनानें घरबसल्या सुखानें देव भेटतो. जेथें बसलां असाल तेथेंच बसून सर्व मन देवाकडे लावून त्याची करुणा भाका. रामकृष्ण, हरि, विठ्ठल, केशव, असा एखाद्या देवाच्या नांवाचा जप करा. तोच मंत्र होय. त्याहून दुसरें सोपें साधन नाहीं, असें मी विठ्ठलाची शपथ खाऊन सांगतों. हें साधन सर्व साधनांपेक्षां सोपें आहे. जो शाहाणा असेल तो यानें आपली तृप्ति करून घेतो.

---

( ८ ) संसार सुखाचा वाटण्यास देवाचे पाय आठविणें हा सोपा उपाय आहे.

संसारा आलिया एक सुख आहे । आठवावे पाय विठोबाचे ॥
येणें होय सर्व संसार सुखाचा । नलगे दुःखाचा लेश कांहीं ॥
घेतलि तयांसी सोपें आहे सुख । बोलियेलें मुखें नारायण ॥
सांगितली सोय करुणासागरें । तुम्हां कां हो बरें न वाटे तें ॥
तुका म्हणे तेणें केला उपकार । भोळ्याभाविकांला तरावया ॥

संसारांत फक्त एकच सुख आहे. तें म्हणजे देवाचे पाय आठविणें हें होय. या एका सुखानें सर्व संसार दुःखरूपी असून सुखाचा वाटूं लागतो; व दुःखाचा लेशही राहात नाहीं. ज्यांना अशा तऱ्हेनें संसाराचें सुख घ्यावयाचें असेल त्यांना तें घेणें सोपें आहे, असें नारायण आपल्या मुखानें स्वतः बोलले आहेत. देव हा करुणेचा सांठा असल्यामुळें त्यानें ही सोय सांगितली आहे. ती तुम्हांला कां बरें आवडत नाहीं ! ज्यांना विशेष ज्ञान नाहीं त्यांनींही तरून जावें म्हणून त्यानें ही सोय सांगण्याचा उपकार केलेला आहे.

---

(९) येईल त्या रीतीनें परंतु भक्तीनें देवाचें स्मरण करा.

नये जरी तुज मधुर उत्तर। दिधला सुस्वर नाहीं देवें ॥
नाहीं तयाविण भुकेला विठ्ठल। येईल तैसा बोल रामकृष्ण ॥
देवापाशीं मागें आवडीची भक्ति। विश्वासेंशीं प्रीति भावबळें॥
तुका म्हणे मना सांगतों विचार। धरावा निर्धार दिसेंदिस ॥

उत्तर—भाषण. विश्वासेंशीं--विश्वासानें.

तुला गोड भाषेनें बोलतां येत नसलें किंवा देवानें तुला चांगला आवाज दिला नसला तरी हरकत नाहीं. देवाला त्याची गरज नाहीं. तुला येईल त्या रीतीनें राम व कृष्ण यांचे गोडवे गा. देवाजवळ मनापासून भक्ति करण्याची इच्छा माग. विश्वासानें व भावबळानें प्रीति मिळते. वरील विचार लक्षांत घेऊन दिवसानुदिवस अधिक निश्चय ठेव.

---

## सद्गुण

(१०) शुद्ध चित्त, संतांशीं नम्रपणा, समाधान राहील असें भाषण व परोपकार हीं देव स्वाधीन करून घेण्याचीं साधनें आहेत.

भावें गावें गीत। शुद्ध करूनिया चित्त ॥
तुज व्हावा आहे देव। तरि हा सुलभ उपाव ॥
आणिकांचे कानीं। गुण दोष मना नाणीं ॥
मस्तक ठेंगणा। करी संतांच्या चरणा ॥
वेचिं तें वचन। जेणें राहे समाधान ॥
तुका म्हणे फार। थोडा तरी पर उपकार ॥

तुला देव पाहिजे असेल तर अगदीं सोपे असे उपाय पुढील आहेत. मन शुद्ध करून भक्तीनें देवाचे गुण गावे. दुसऱ्याचे दोष कानीं घेऊन त्यांकडे मन गुंतवूं नये. देवाचे जे उत्तम भक्त असतील अशा सज्जनांच्या चरणीं नम्र होऊन राहावें. ज्या बोलण्यानें दुःख उत्पन्न न होतां सर्वत्र समाधान पसरेल असें भाषण करीत जावें, आणि दुसऱ्यावर थोडाफार उपकार करीत असावें.

---

( ११ ) तुम्हांला खरें हित साधावयाचें असेल तर शुद्ध चित्तानें एकांतांत देवाचें चिंतन करा व वासना नाहींतशा करा.

हित व्हावें तरी दंभ दुरी ठेवा। चित्तशुद्धि सेवा देवाची हे ॥
आवडी विठ्ठल गाईजे एकांतीं। अलभ्य ते येती लाभ घरा॥
आणीका अंतरीं न द्यावी वसति। करावी हे शांती वासनेची ॥
तुका म्हणे बाण हा चि निर्वाणींचा। वाउगी हे वाचा वेचूं नये ॥

तुम्हांला आपलें हित करून घ्यावयाचें असेल तर देवाच्या सेवेकरितां तुम्ही करतां त्या बाह्य प्रदर्शनापासून दूर व्हा. दंभ नाहींसा झाल्यावर चित्त शुद्ध होतें. शुद्ध चित्तानें देवाची सेवा करावी. एकांतांत मनापासून देवाच्या गुणांचें चिंतन केलें तर कधीं न होणारे लाभ होतात. आपल्या अंतःकरणांत इतर कोणत्याही विचारास थारा देऊं नये, व त्याकरितां आपल्या वासना नाहींशा कराव्या. हा उपाय अगदीं रामबाण आहे. आपल्या वाणीचा भलत्या रीतीनें उपयोग करूं नये.

---

( १२ ) चित्त शुद्ध करून भाव एकविध झाल्यास अंतःकरणांत गोपाळ येऊन राहातो.

बैसोनि निवांत शुद्ध करी चित्त। तया सुखा अंत पार नाहीं॥
येऊनि अंतरीं राहील गोपाळ। सायासाचें फळ बैसलिया ॥
रामकृष्ण हरि मुकुंद मुरारी। मंत्र हा उच्चारीं वेळोवेळां ॥
तुका म्हणे ऐसें देईन मी दिव्य। जरी होईल भाव एकविध ॥

दिव्य--शपथ.

सर्व वासना सोडून निवांत बैस, व चित्त शुद्ध कर. त्यामुळें अपार व अनंत काळ टिकणारें सुख मिळतें. कारण अशा रीतीनें अंतःकरण शुद्ध करूं लागणारास त्या मेहनतीचें फळ असें मिळतें कीं, अंतःकरणांत देव येऊन राहातो. ( अंतःकरण शुद्ध होण्याकरितां ) 'रामकृष्ण हरी मुकुंद मुरारी'

हा मंत्र ( दिवसांतून ) अनेकदां म्हणत जा. जर फक्त देवाकडे भाव राहिला तर असें फळ मिळेल याबद्दल मी शपथ घेतों.

---

( १३ ) परद्रव्य व परनारी यांचा विटाळ टाळणें ज्यास साधतें तो देवासमान होय.

साधनें तरी हीं च दोन्ही । जरी कोणी साधील ॥
**परद्रव्य परनारी । याचा धरीं विटाळ ॥**
देवभाग्यें घरा येती । संपत्ती त्या सकळा ॥
तुका म्हणे तें शरीर । गृह भांडार देवाचें ॥

परमार्थ इच्छिणाऱ्यानें दोन मुख्य साधनें साधावीं. दुसऱ्याचा पैसा व बायको यांचा विटाळ धरावा. ( स्पर्श करण्यास अयोग्य असें समजावें.) असें केल्यानें देवाचें ऐश्वर्य व त्याच्या सर्व प्रकारच्या दैवी संपत्ति घरीं येतात. अशा मनुष्याचें शरीर म्हणजे देवाचा खजिना होय. ( सर्व चांगले गुण ठेवण्यास देव या मनुष्याचा देह पसंत करितो.)

---

( १४ ) कामक्रोधांनीं खवळून न जातां शांति धरल्यास त्रिविधताप सोसावे लागत नाहींत.

**शांतीपरतें नाहीं सुख । येर अवघें ची दुःख ॥**
म्हणउनी शांति धरा । उतराल पैल तीरा ॥
खवळलिया कामक्रोधीं । अंगीं भरती आधि व्याधी ॥
तुका म्हणे त्रिविध ताप । जाती मग आपेंआप ॥

शांतीवेगळें दुसरें सुख नाहीं. दुसरीं सुखें केवळ दुःखास कारण होतात. म्हणून शांति धरलीत कीं, या संसाराच्या पलीकडील तीराला पोहोंचाल. कामक्रोधादि भाव खवळले असतां मानसिक व शारीरिक दुःख होतें. शांतीचा आश्रय केला म्हणजे आधिदैविक, आध्यात्मिक व आधिभौतिक हे तिन्ही ताप नाहींसे होतात.

---

(१५) क्षमेमुळें दुष्टांचें कृत्य विझून सर्वांचें हित होतें.

**क्षमाशस्त्र जया नराचिया हातीं। दुष्ट तयाप्रति काय करी॥**
**तृण नाहीं तेथें पडिला दावाग्नि। जाय तो विझोनि आपसया॥**
**तुका म्हणे क्षमा सर्वांचें स्वहित। धरा अखंडित सुखरूप॥**

दावाग्नि—रानांतील अग्नि. आपसया—आपोआप.

ज्या मनुष्याजवळ क्षमारूपी शस्त्र आहे त्याला दुष्ट काय करणार आहे! जेथें गवत नाहीं तेथें त्वरेनें आग-पसरविणारा रानांतील अग्नि पडला तरी तो आपोआप विझून जातो. क्षमा ही सर्वांचें हित करून देणारी आहे. तिचा आश्रय करा. ती कायम सुख देणारी आहे.

---

(१६) उदासीनता, परिमित भोजन व निद्रा, स्त्रियांपासून दूर राहाण्याचें धोरण या साधनांनीं देवाची कृपा मिळते.

**साधकाची दशा उदास असावी। उपाधि नसावी अंतर्बाहीं॥**
**लोलुप्यता काय निद्रेतें जिणावें। भोजन करावें परमित॥**
**एकांतीं लोकांतीं स्त्रियांशीं वचन। प्राण गेल्या जाण बोलों नये॥**
**संग सज्जनांचा उच्चार नामाचा। घोष कीर्तनाचा अहर्निशीं॥**
**तुका म्हणे ऐशा साधनीं जो राहे। तो चि ज्ञान लाहे गुरुकृपा॥**

ईश्वराचें साधन करणाऱ्यानें संसारांतील घडामोडीबद्दल उदास असावें. (कशांतही मन गुंतवून ठेवूं नये). बाहेर त्याचप्रमाणें अंतःकरणांत जगांतील गोष्टींचे पाश नसावे. काम व लोभ ठेवूं नये. निद्रा ताब्यांत असावी व जेवणही बेताचें असावें. साधकानें लोकांपासून लपवून एकांतांत (पर) स्त्रियांशीं संकेत करूं नयेत. प्राणावरचा प्रसंग असला तरी पर्वा करूं नये. सज्जनाचा संग व रात्रंदिवस नामसंकीर्तन अशा साधनांत जो मग्न असतो त्यालाच खरें ज्ञान मिळतें व त्यावर गुरुकृपा होते.

---

(१७) मनाच्या आधीन न होतां मन आपल्या आधीन ठेवावें.

होऊं नको कांहीं या मना आधीन । नाइकें वचन याचें कांहीं ॥
हटियाची गोष्टी मोडून टाकावी । सोई ही धरावी विठोबाची ॥
आपुलें आधीन करूनियां ठेवा । नाहींतरि जीवा घातक हें ॥
तुका म्हणे जाले जे मना आधीन । तयांसी बंधन यम करी ॥

हटियाची—हट्टाची.

मनाचा ताबेदार मुळींच होऊं नकोस, व त्याचें कांहींही ऐकूं नकोस. मन सांगत असलेली हट्टाची वाकडी गोष्ट मोडून काढीत जावी; व विठोबाकडे जाण्याचा सरळ मार्ग धरावा. आपल्या ताब्यांत मन ठेविलें नाहीं तर आपल्या आयुष्याच्या नाशास तें कारण होतें. जे मनाच्या स्वाधीन होतात त्यास यम बंधन करतो (ते यमाच्या स्वाधीन होतात.)

---

(१८) चित्त शुध्द व बुद्धि स्थिर करून मनाची ओढ चुकविली कीं उपदेशाची जरूरी नाहीं.

उचित जाणावें मुख्य धर्म आधीं । चित्त शुद्ध बुद्धी ठायीं स्थीर॥
न घालावी धांव मनाचिये ओढी । वचन आवडी संतांचिये ॥
अंतरीं या राहे वचनाचा विश्वास । न लगे उपदेश तुका म्हणे ॥

उचित—योग्य. वचन--सांगणें, शिकविणें.

चित्त शुद्ध असावें व बुद्धि देवाकडे स्थिर असावी, हे मुख्य धर्म जरूर आहेत, हें प्रथम लक्षांत घ्या. मन विषयाकडे ओढतें; त्याच्यामागें बुद्धीनें धाव घेऊं नये. संतांनीं जो मार्ग दाखविला आहे त्याची गोडी लावून घ्यावी. त्या संतांच्या शिकविण्यावर मनापासून विश्वास बसल्यास उपदेश घेण्याची जरुरी नाहीं.

---

(१९) कोणत्याही उद्योगांत असलां तरी देवाकडील लक्ष चुकवूं नका.

पाण्या निघाली गुजरी । मन ठेविलें दों घागरीं ॥
चाले मोकळ्या पदरीं । परी लक्ष तेथें ॥
वावडी उडाली अंबरीं । हातीं धरोनियां दोरी ॥
दिसे दुरिच्या दुरी । परी लक्ष तेथें ॥
चोर चोरी करी । ठेवी वनांतरीं ॥
वर्ततसे चराचरीं । परी लक्ष तेथें ॥
तुका म्हणे असों । भलतिये व्यापारीं ॥
लक्ष सर्वेश्वरीं । चुकों नेदी ॥

संग्रहालय स्थळ प्रत ११२९ सं. ३१४ ता. २१२

वावडी—पतंग. अंबरीं—आकाशांत.

गुजराथी बाई पाण्याला ( डोक्यावर दोन घागरी घेऊन ) निघते तेव्हां ती मोकळ्या पदरानें ( जवळ कांहीं नाहीं अशा थाटानें ) चालत असते. परंतु तिचें मन आपल्या डोक्यावरील दोन घागरींकडे असतें. आपण हातांत दोर धरून आकाशांत पतंग उडवितो. तो किती लांब जातो पण आपलें लक्ष वावडीकडे असतें. चोर चोरी करून अरण्यांत ती लपवून ठेवतो; व आपण पुनः लोकांत वावरतो; परंतु त्याचें सर्व लक्ष अरण्यांत ठेवीकडे असतें. यावरून हेंच शिकावें कीं, आपणांस कोणतेही उद्योग करावे लागोत, आपलें सर्वेश्वराकडील लक्ष चुकूं देऊं नये.

---

## भाव

( २० ) पूजा, जप, ईश्वरगुणगायन यांपेक्षां विषय व मलिन-बुद्धि यांचा त्याग व भाव हे महत्त्वाचे आहेत.

कासिया पाषाण पूजिती पितळ । अष्ट धातु खळ भावहीण ॥
भाव चि कारण भाव चि कारण । मोक्षाचें साधन बोलियेलें ॥
काय करितील जपमाळा कंठमाळा । करिशी वेळोवेळां विषय जप
काय करिशील पंडित हे वाणी । अक्षराभिमानी थोर होय ॥
काय करिशील कुशल गायन । अंतरीं मळीण कुबुद्धि ते ॥
तुका म्हणे भाव नाहीं करी सेवा । तेणें काय देवा योग्य होशी ॥

भावहीन लोक दगड, पितळ यांच्या मूर्ति भाव नसून कशाकरितां पूजितात तें समजत नाहीं. मोक्षाचें साधन भावच होय असें संतांनीं व देवानें सांगितलेलें आहे. तूं जर घटकेघटकेस विषयांचा जप करीत असशील तर जपाच्या माळा व कंठांतील माळा धारण करून तूं काय करणार ! आपल्या ज्ञानाविषयीं तुला अभिमान वाटतो. तेव्हां तुझी वाणी पांडित्याची असून काय उपयोगाची ! अंतःकरणांत जर वाईट बुद्धि असेल तर तुझ्या उत्तम कुशलतेच्या ईश्वरपर गायनाचा काय उपयोग होईल ! खरा भाव नसून तूं ईश्वराची सेवा केलीस तर तूं देवाला कसा योग्य वाटशील !

---

( २१ ) बाह्य सोंगानें देव मिळत नाहीं.

सोंगें छंदें कांहीं। देव जोडे ऐसें नाहीं ॥
सारा अवघें गाबाळ। डोळ्या आडील पडळ ॥
**शुद्ध भावाविण। जो जो केला तो तो सीण ॥**
तुका म्हणे कळे। परि होताती अंधळे ॥

**गाबाळ—चुकीच्या गोष्टी. पडळ—पडदा.**

धार्मिक आचारांची वतावणी करून देव जोडत नाहीं. डोळ्यावरील हा चुकीच्या समजुतीचा भ्रम काढून टाका; व हा गाबाळ मार्ग सोडून द्या. शुद्ध भाव ठेविल्याशिवाय जे प्रयत्न होतात, ते केवळ श्रमाचे व दुःखाचे होत. हें समजण्यास सोपें आहे परंतु मनुष्यें आंधळीं होतात. (कळलेल्या गोष्टीप्रमाणें चालत नाहींत.)

---

( २२ ) पाठांतर हें ओझें होय.शुद्ध अंतःकरण हें देव मिळविण्याचें योग्य साधन होय.

थोर ते पाहिजे गळाली अहंता। उपदेश घेतां सुख वाटे ॥
**व्यर्थ भराभर केले पाठांतर। जोवरी अंतर शुद्ध नाहीं ॥**
घोडे काय थोडे वागवितें ओझें। भावेंविण तैसें पाठांतर ॥
तुका म्हणे धरा निष्ठावंत भाव। जरि पंढरीराव पाहिजे तो ॥

अहंभाव फार बळवान्. तो पूर्ण नाहींसा झाला तरच उपदेश घेतल्यानें सुख होतें. जोंपर्यंत अंतःकरण शुद्ध नाहीं, तोंपर्यंत पाठांतराचा कांहीं उपयोग नाहीं. घोडें पुष्कळ ओझें पाठीवर घेतें, परंतु त्या ओझ्याचा आस्वाद त्यास घेतां येत नाहीं. त्याप्रमाणेंच भावाशिवाय पाठांतराचा उपयोग नाहीं. जर तुम्हांस देव पाहिजे असेल तर, निष्ठापूर्वक भाव ठेवण्यास शिका.

---

( २३ ) अन्न, पाणी, छाया यांचें सुख त्यांचे सेवनानें समजतें, तसेंच देवाचें सुख भावानें समजतें.

अन्नाच्या परिमळें जरि जाय भूक। तरि कां हे पाक घरोघरीं ॥
आपुलालें तुम्हीं करा रे स्वहित। वाचे स्मरा नित्य राम राम ॥
देखोनि जीवन जरि जाय तान। तरी कां सांटवण घरोघरीं ॥
देखोनियां छाया सुख न पवीजे। जंव न बैसीजे तया तळीं ॥
हित तरी होय गातां आइकतां। जरि राहे चित्ता दृढभाव ॥
**तुका म्हणे होसी भावें चि तूं मुक्त। काय करिसी युक्त जाणिवेची**

**जीवन**—पाणी. **न पविजे**—पावणार नाहीं. **युक्त**--युक्ति.

अन्नाचा वास घेऊन भूक भागली असती तर, घरोघर अन्न कां करावें लागलें असतें ! (या दाखल्यावरून हें उघड आहे कीं, देवाचें नांव व गुणकीर्तन ओझरतें ऐकून भागणार नाहीं.) तुम्हीं आपलें हित करण्याकरितां भाव ठेवून नियमानें रामाला स्मरा. पाणी दृष्टीपुढें आल्याबरोबर तहान नाहींशी झाली असती तर, पाण्याची साठवण घरोघर कां करावी लागली असती ! सावली नुसती पाहून सुख होत नाहीं, सावलीच्या तळास जाऊन बसल्यावरच तें होतें. ईश्वरगुण गातांना व ऐकतांना जर चित्तांत पुरा भाव असला तरच हित होतें. तुझा भाव खरा असला तरच या जगाच्या पाशापासून तूं मुक्त होशील. ईश्वरसाधनाचें ज्ञान मला आहे, अशा ज्ञानाच्या अहंकाराची जोड करून, तुला कोणता फायदा होणार आहे !

---

## भक्ति

( २४ ) संसारांतील उद्वेग देवाच्या पायीं वाहावे, हीच थोर भक्ति होय.

हेचि थोर भक्ति आवडती देवा। संकल्पावी माया संसाराची ॥
ठेविलें अनंतें तैसेचि रहावें। चित्तीं असों द्यावें समाधान ॥
वाहिल्या उद्वेग दुःख चि केवळ। भोगणें तें फळ संचिताचें ॥
तुका म्हणे घालूं तयावरी भार। वाहूं हा संसार देवा पायीं ॥

संकल्पावी--टाकावी. उद्वेग--काळजी.

संसारांतील मोह सोडून देणे हीच भक्ति देवाला खरी आवडते. देवानें ज्या परिस्थितींत ठेवलें असेल, तींत समाधानानें राहण्यास शिकावें. कारण, उद्वेग मानल्यानें दुःख मात्र होतें. संचिताचें जें फळ असेल, तें भोगावेंच लागतें. देव आपल्याला सामर्थ्य देईल असा विचार ठेवून, संसारांतील चिंता देवाच्या पायावर ठेवाव्या.

---

( २५ ) विषयांचें दास्य करणारास वैकुंठनायक सापडत नाहीं. तो सापडण्यास सर्व देहवासना सोडाव्या लागतात. तीच खरी भक्ति.

झुंझायाच्या गोष्टी ऐकतांचि सुख। करितां हे दुःख थोर आहे ॥
तैसी हरिभक्ति सुळावरील पोळी। निवडे तो बळी विरळा शूर ॥
पिंड पोसिलिया विषयांचा पाईक। वैकुंठनायक कैंचा तेथें ॥
तुका म्हणे व्हावें देहासी उदार। रकुमादेवीवर जोडावया ॥

पाईक--नोकर.

लढाईच्या हकीकती ऐकण्यास मौज वाटते. परंतु लढाईत भाग घेणें ही मोठ्या दुःखाची बाब असते. त्याचप्रमाणें देवाची भक्ति करण्याचें काम हें शूळ पोटांत जाऊन पोळी मिळविण्यासारखें असतें. येथें जो निवडक ठरतो तो असामान्य शूर असतो. स्वतःच्या इंद्रियांचे लाड केल्यास मनुष्य इंद्रियांच्या विषयांचा नोकर होतो. त्यास वैकुंठाचा नायक ( देव ) कसा

लाभणार ! ज्यांना देव जोडण्याची इच्छा असेल, त्यांनीं देहाच्या सर्व वासना सोडण्याची तयारी केली पाहिजे.

सं. ता.

---

### भक्त

( २६ ) सर्वांभूतीं देव आहे, असें मानणाराच विठ्ठलाचा खरा भक्त होय.

पंडित तो चि एक भला । नित्य भजे जो विठ्ठला ॥
अवघें सम ब्रह्म पाहे । सर्वां भूतीं विठ्ठल आहे ॥
रिता नाहीं कोणी ठाव । सर्वां भूतीं वासुदेव ॥
तुका म्हणे तो चि दास । त्या देखिल्या जाती दोष ॥

जो रोज देवाचें भजन करितो म्हणजे सर्व ब्रह्मरूप आहे असें समदृष्टीनें पाहातो व प्राणिमात्रांत ईश्वराचा अंश आहे हें कळून वागतो त्यासच खरोखर पंडित म्हणावें. एकहि ठिकाण देवाशिवाय नाहीं, तसेंच प्राणिमात्रांत देव आहे, हें जाणणाराच ईश्वराचा खरा भक्त होय. अशा भक्ताच्या सान्निध्यानें आपले सर्व दोष नाहींसे होतात.

---

( २७ ) जो भूतदयेनें वागतो व कोणाजवळ कांहीं मागत नाहीं तो देवाचा आवडता असतो.

कांहीं न मागे कोणांसी । तो चि आवडे देवासी ॥
देव तयासी म्हणावें । त्याचे चरणीं लीन व्हावें ॥
भूतदया ज्याचे मनीं । त्याचें घरीं चक्रपाणी ॥
नाहीं नाहीं त्यासमान । तुका म्हणे मी जमान ॥

जमान—जामीन.

जो कोणाजवळ कांहीं मागत नाहीं, तोच देवाचा आवडता होतो. खरोखर त्यास देवच म्हटलें पाहिजे. अशा मनुष्याच्या पायीं देव म्हणून लीन

झालें पाहिजे. ज्याच्या मनाला प्राणिमात्राची काळजी असते त्याच्या घरीं देव असतो. त्याच्या योग्यतेचा भक्त दुसरा कोणी नाहीं, याबद्दल मी खात्री देतों.

---

(२८) जो तन, जन, धन यांस तृण मानून निर्धारानें देवास प्रमाण मानतो, तो कोणत्याही जातीचा असला तरी वैष्णव होय.

**वैष्णव तो जया। अवघी देवावरी माया ॥**
**नाहीं आणीक प्रमाण। तन धन तृण जन ॥**
**पडतां जडभारी। नेमा न टळे निर्धारीं ॥**
**तुका म्हणे याती। हो कां तयाची भलती ॥**

**जडभारी**--संकट. **निर्धारीं**---निश्चयानें. **प्रमाण**--मान्य गोष्ट.

ज्याचें सर्व प्रेम फक्त देवावरच असतें, तोच देवाचा भक्त होय. त्यास दुसरें कांहींही मान्य नसतें. तो शरीर, संपत्ति व जगांतील लोक यास गवताच्या काडीइतपत क्षुद्र लेखतो. मोठें संकट ओढवलें तरी, निर्धारानें आपण ठरविलेल्या नियमापासून तो ढळत नाहीं. अशा मनुष्याची जात अगदीं कमी प्रतीची असली तरी, त्यास वैष्णवाचा मान पाहिजे.

---

(२९) वर्णाभिमानानें कोणीही पावन झाले नाहींत. मात्र अंत्यजासुद्धां सर्व जातीचे भक्त तरले आहेत.

**पवित्र तें कूळ पावन तो देश। जेथें हरिचे दास जन्म घेती ॥**
**कर्मधर्म त्याचे जाला नारायण। त्याचेनी पावन तिन्ही लोक ॥**
**वर्णअभिमानें कोण जाले पावन। ऐसें द्या सांगून मजपाशीं ॥**
**अंत्यजादि योनि तरल्या हरिभजनें। तयांचीं पुराणें भाट जालीं ॥**
**वैश्य तुळाधार गोरा तो कुंभार। धागा हा चांभार रोहिदास ॥**
**कबीर मोमीन लतिफ मुसलमान। सेना न्हावी जाण विष्णुदास ॥**
**कान्होपात्रा खोदु पिंजारी तो दादु। भजनीं अभेदू हरिचे पायीं ॥**
**चोखामेळा बंका जातीचा माहार। त्यासी सर्वेश्वर ऐक्य करी ॥**

नामयाची जनी कोण तिचा भाव। जेवी पंढरीराव तिच्यासवें ॥
मैराळ जनक कोण कुळ त्याचें। महिमान तयाचें काय सांगों ॥
यातायातीधर्म नाहीं विष्णुदासां। निर्णय हा ऐसा वेदशास्त्रीं ॥
तुका म्हणे तुम्हीं विचारावे ग्रंथ। तारिले पतित नेणों किती ॥

यायायातीधर्म—यातीचा धर्म. भाट—स्तुति करणारीं.
महिमान--मोठेपणा.

ज्या कुळांत व ज्या देशांत ईश्वराचे भक्त जन्म घेतात तें कूळ व तो देश हीं पवित्र मानलीं पाहिजेत. ज्या भक्तांचा धर्म व कर्म ईश्वर आहे त्यांच्या-मुळें तिन्ही लोकसुद्धां पवित्र होतील. मी चांगल्या वर्णाचा असें मानण्यानें कोणाला देवाची कृपा मिळाल्याचें उदाहरण असल्यास मला दाखवा. देवाच्या भजनानें अंत्यजांचाही (सर्वांत कमी मानलेल्या जातींचाही) उद्धार झाला व पुराणांनीं त्यांचें गुणवर्णन मोठ्या आवडीनें केलें. तुळाधार हा वैश्य होता व गोरा हा कुंभार होता. धागा व रोहिदास चांभार होते. कबीर हा मोमीन, लतीफ मुसलमान, सेना हा न्हावी, पण हे सर्व विष्णुदास झाले. कान्होपात्रा कलावंतीण, खोदू हिजडा, दादू पिंजारी या सर्वांविषयीं त्यांच्या भक्तीमुळें देवाच्या पायाजवळ भेद नव्हता. चोखामेळा, वंका जातीचे महार पण देवानें त्यांस जवळ घेतले. नामदेवाची दासी जनी हिचा भाव इतका मोठा कीं देव तिच्याजवळ जेवीत होते. मैराळजनकाचे कोणते कूळ पण त्याला किती मोठेपणा मिळाला. विष्णुदास होण्याच्या कामीं जात आडवी येत नाहीं, असा निकाल वेदांनीं व शास्त्रांनीं दिलेला आहे. तुम्ही धर्मशास्त्रपुराणांचे ग्रंथ वाचून पाहा, म्हणजे पतित उद्धारल्याचीं अनेक उदाहरणें तुम्हांस आढळतील.

---

## ३ साध्य व फळ

### सज्जन

( ३० ) जे दुसऱ्यांच्या सुखानें सुख पावतात व जे परिसाप्रमाणें स्वतःचा थोरपणा विसरून दुसऱ्याच्या कल्याणासाठीं देह झिजवितात, ते संत होत.

काय वाणूं आता न पुरे हे वाणी। मस्तक चरणीं ठेवीतसें ॥
थोरींव सांडिली आपुली परिसें। नेणे सिवों कैसें लोखंडासी ॥
**जगाच्या कल्याणा संतांच्या विभूति। देह कष्टवीती उपकारें॥**
भूतांची दया हें भांडवल संता। आपुली ममता नाहीं देहीं ॥
तुका म्हणे सुख पराविया सुखें। अमृत हें मुखें स्रवतसे ॥

थोरींव—मोठेपणा. पराविया—दुसऱ्याच्या.

संतांची स्तुति पूर्ण रीतीनें करण्यास माझी वाणी अगदींच अपुरी पडते. म्हणून मी आपलें डोकें त्यांच्या पायावर ठेवूनच मला त्यांची योग्यता किती वाटते तें दाखवितों. परीस आपला मोठेपणा विसरून लोखंडास शिवून त्याचें सोनें करतो. हीन लोखंडास कसा शिवूं असा विचार तो करीत नाहीं; त्याचप्रमाणें संतांच्या विभूति जगाच्या कल्याणाकरितां आपल्या देहाला कष्ट देऊन जगावर उपकार करीत असतात. प्राणिमात्रावर दया करण्यास मिळणें यासच संत आपली मिळकत समजतात. त्यांची स्वतःच्या देहावर मुळींच आसक्ति ( ममता ) नसते. दुसऱ्यांना सुख मिळवून देण्यांतच त्यांना स्वतःला सुख वाटतें व त्यांच्या तोंडांतून जे शब्द निघतात ते अमृताप्रमाणें मोलाचे व समाधानाचे ठरतात.

---

( ३१ ) गांजलेल्यांना आपले म्हणविणारा, लोण्यासारखें मऊ चित्त असलेला व सर्वांवर सारखी दया करणारा मनुष्य देवच होय.

जें कां रंजले गांजले । त्यासी म्हणे जो आपुलें ॥
तो चि साधु ओळखावा । देव तेथें चि जाणावा ॥
मृदु सबाह्य नवनीत । तैसें सज्जनाचें चित्त ॥
ज्यासि आपंगिता नाहीं । त्यासि धरी जो हृदयीं ॥
दया करणें जें पुत्रासी । ते चि दासा आणि दासी ॥
तुका म्हणे सांगूं किती । तो चि भगवंताची मूर्ती ॥

आपंगिता—सांभाळणारा.

दुःखानें टेकीस आले आहेत व ज्यांचा छळ होत आहे अशा लोकांस जो आपले म्हणवितो तोच साधु होय. देव त्याच्या ठिकाणीं असतो. लोणी हें सर्वत्र एकजात मऊ असतें; तसेंच सज्जनांचें चित्त सर्वत्र लोण्याधारखें मऊ असतें. ज्याची काळजी घेणारा कोणी नाहीं त्यास जवळ करून जो प्रेमानें वागवितो, तसेंच विकत घेतलेल्या नोकरांशीं देखील जो स्वतःच्या मुलांशीं वागावें इतक्या दयेनें वागतो, तो देवासमान होय. दुसऱ्या कोणत्याही दाखल्यानें त्याची योग्यता सांगतां येणार नाहीं.

---

( ३२ ) परिस, चंदन, दिवा, साखर यांच्या प्रमाणेंच सज्जनाजवळ वाईट गुण सापडत नाहीं.

चंदनाचे हात पाय ही चंदन । परिसा नाहीं हीन कोणी अंग ॥
दीपा नाहीं पाठीं पोटीं अंधकार । सर्वांगें साकर अवघी गोड ॥
तुका ह्मणे तैसा सज्जनापासून । पाहातां अवगुण मिळेचिना ॥

चंदनाच्या झाडाच्या सर्व भागांत चंदनाचे गुण असतात. परिसाचा कोणताही भाग कमी गुणाचा नसतो. ( कोणत्याही भागास लोखंड लागलें तरी उत्तम सोनें होतें.) दिव्याचा कोणत्याही बाजूस अंधकार नसतो. साखर प्रत्येक कणांत सारखी गोड असते. त्याप्रमाणें सज्जन सर्व दृष्टींनीं सद्गुणी असतो. मुद्दाम शोधला तरी त्याजजवळ वाईट गुण सांपडणार नाहीं.

---

( ३३ ) जगाचे आघात सोसून टिकतो तोच संत होय.

हिरा ठेवितां ऐरणीं । वांचे मारितां जो घणीं ॥
तोचि मोल पावे खरा । करणिचा होय चुरा ॥
मोहरा होय तोचि अंगें । सूत न जळे ज्याचें संगें ॥
**तुका म्हणे तोचि संत । सोसी जगाचे आघात ॥**

**मोहरा**—एकप्रकारचें रत्न. **करणीचा**—कृत्रिमाचा.

ऐरणीवर ठेवून घणानें ठोंके मारिले असतां जो फुटत नाहीं तोच खरा मोलवान् हिरा होय. त्यालाच किंमत असते. हिऱ्याप्रमाणें दिसणाऱ्या कृत्रिम खड्याचा तेव्हांच चुरा होतो. ज्याच्या सानिध्यानें सूत जळत नाहीं तोच ज्ञातिवंत मोहरा होय. त्याचप्रमाणें जो जगांतील आघात (त्रास, टीका, छळ, दुःख ) शांत मनानें सोसतो त्यासच संत म्हणतां येतें.

---

( ३४ ) शिक्षकाप्रमाणें संत लोकांना धडा घालून देतात.

अर्भकाचे साठीं । पंतें हातीं धरिली पाटी ॥
तैसे संत जगीं । क्रिया करूनि दाविती अंगीं ॥
बालकाचे चाली । माता जाणुनि पाऊल घाली ॥
तुका म्हणे नाव । जनासाटीं उदकीं ठाव ॥

पंतोजी स्वतः हातांत पाटी घेऊन मुलांना धडा देतात, तसेंच संत जगांत स्वतः क्रिया करून उदाहरण दाखवितात. मुलाच्या चालीस योग्य अशीं लहान पावलें आई जाणून बुजून टाकते. नाव लोकांना तरून नेण्याकरितां पाण्यांत असते, त्याचप्रमाणें संत उदाहरणानें लोकांना योग्य मार्ग दाखवितात; आणि नावेप्रमाणें तारतात.

---

**ईश्वर व भक्त**

( ३५ ) झाड आणि बीं, पाणी आणि लाट, मूळस्वरूप आणि छाया याप्रमाणेंच देव व भक्त होत.

५६२८

तरुवर बीजापोटीं । बीज तरुवरा सेवटीं ॥
तैसें तुम्हां आम्हां जालें । एकीं एक सामावलें ॥
उदकावरील तरंग । तरंग उदकाचें अंग ॥
तुका म्हणे बिंबच्छाया । ठायीं पावली विलया ॥

मोठें झाड बीच्या पोटांत असतें व बीं तरी शेवट झाडालाच येतें. त्याचप्रमाणें तुमचा व आमचा संबंध आहे. आपणां दोघांचा एकमेकांत झाड व बीं याप्रमाणें समावेश आहे. पाण्याची लाट पाण्यावर असली तरी ती पाण्याचेंच अंग होय. बिंब आणि छाया एकें ठिकाणीं आलीं कीं, छाया नाहींशी होते.

---

( ३६ ) गूळ आणि गोडी वेगळी नाहीं, त्याप्रमाणे ईश्वर व भक्त वेगळे नाहींत.

गोडीपणे जैसा गुळ । तैसा देव जाला सकळ ॥
आतां भजों कवणे परी । देव सबाह्य अंतरीं ॥
उदका वेगळा । नव्हे तरंग निराळा ॥
हेम अळंकारा नामीं । तुका म्हणे तैसे आम्ही ॥

गूळ आणि गोडी वेगळी नाहीं; गुळांत सर्वत्र गोडी आहे. त्याचप्रमाणें सर्व वस्तु व देव एक आहेत. अंतर्बाह्य सर्वत्र देव आहे हें समजल्यावर त्याचें पूजन कोणत्याप्रकारें करावें ! पाण्याची लाट पाण्यापासून वेगळी संभवत नाहीं. सोन्याचे अलंकार आणि सोनें यांत वेगळेपणा नांवांत आहे. अलंकाराचें नांव वेगळें असलें तरी तो सोनेंच आहे. त्याचप्रमाणें ईश्वर आणि आम्ही नांवाला वेगळे आहों.

---

## फळ

( ३७ ) गोविंदाचा छंद लागल्यास आपलें शरीर ईश्वररूप होतें.

गोविंद गोविंद । मना लागलिया छंद ॥
मग गोविंद ते काया । भेद नाहीं देवा तया ॥

आनंदले मन। प्रेमें पाझरती लोचन ॥
तुका म्हणे आळी। जेवी नुरे चि वेगळी ॥

गोविंद गोविंद असें चिंतन करून मनाला गोविंदाचा ध्यास लागला कीं, तो मनुष्य गोविंदरूप होतो. तो मनुष्य व देव यांत फरक राहात नाहीं. गोविंदरूप झाल्यामुळें मनास अपार आनंद होतो; व डोळ्यांतून आनंदाश्रु वाहूं लागतांत. ज्याप्रमाणें आळी पतंगाचें ध्यान करून पतंग होते, त्याप्रमाणें मनुष्य ईश्वराचें ध्यान करून ईश्वर होतो.

---

( ३८ ) ईश्वराचें चिंतन मनापासून केलें तर मन बदलून सर्व सृष्टि हरिरूप दिसूं लागते.

ध्यानीं ध्यातां पंढरिराया। मनासहित पालटे काया ॥
तेथें बोला कैंची उरी। माझें मीपण जाला हरि ॥
चित्तचैतन्यीं पडतां मिठी। दिसे हरिरूप अवघी सृष्टि ॥
तुका म्हणे सांगों काय। एकाएकीं हरि वृत्तिमय ॥

पंढरिरायाचें ध्यान साधलें तर मन व शरीर दोन्हीं पालटून जातात. तेथें स्वतःचें असें म्हणण्यास कांहीं शिल्लक रहात नाहीं. कारण माझें व मी देवासच म्हणावें लागतें. आपलें चित्त आणि देव यांची मिठी बसली तर सर्व सृष्टि हरिरूप दिसावयास लागते. काय सांगावें ! एकाएकीं आपली वृत्ति हरिमय होते.

---

( ३९ ) कायावाचामनानें ईश्वराचे दास झाल्यावर कामक्रोध निघून जातात व त्या निर्मळ अंतःकरणांत ईश्वर येऊन राहातो.

कायावाचामनें जाला विष्णुदास। कामक्रोध त्यास बाधीतना ॥
विश्वास तो करी स्वामीवरी सत्ता। सकळ भोगिता होय त्याचें ॥
तुका म्हणे चित्त करावें निर्मळ। येउनि गोपाळ राहे तेथें ॥

शरीरानें, वाणीनें व मनानें म्हणजे सर्वभावानें जो देवाचा दास होतो त्यास कामक्रोधादिकांची बाधा होत नाहीं. देवावरील विश्वासामुळें त्याची सत्ता देवावर चालते; व त्यास देवाचें ऐश्वर्य भोगावयास मिळतें. (किंवा-देव त्याचे भोग भोगणारा होतो.) आपलें चित्त निर्मळ करावे म्हणजे तेथें देव येऊन राहातो.

---

( ४० ) मी अनुभवानें सांगतों कीं, रामरसाची चव दुसऱ्या रसास नाहीं.

राम म्हणतां रामचि होइजे । पदीं बैसोन पदवी घेइजे ॥
ऐसे सुख वचनीं आहे । विश्वासें अनुभव पाहे ॥
रामरसाचिया चवी । आनरस रुचती केवीं ॥
तुका म्हणे चाखोनी सांगे । मज अनुभव आहे अंगें ॥

आन—दुसरा.

रामाचें चिंतन केलें असतां रामच होतां येतें. रामाच्या पायीं बसून रामाची पदवी घेतां येते. वचनांत राम असला कीं, असें सुख मिळतें. तुम्ही विश्वास ठेवून याचा अनुभव पहा. रामरसाची गोडी लागल्यावर इतर रस कसे आवडतील ! मी तो रस चाखून मग तुम्हांस सांगत आहें. त्याच्या परिणामाचा अनुभव मीं जातीनें घेतला आहे.

---

( ४१ ) जो सर्व कृत्यें ईश्वरार्पण करतो तो मनुष्य ईश्वरस्वरूप होतो.

कृष्ण गातां गीतीं कृष्ण ध्यातां चित्तीं ।
तेही कृष्ण होती कृष्णध्यानें ॥
आसनीं शयनीं भोजनीं जेवितां । म्हणा रे हा भोक्ता नारायण ॥
ओवियें दळणीं गावा नारायण । कांडितां कांडण करितां काम ॥
नर नारी याति हो कोणी भलती । भावें एका प्रीतीं नारायणा ॥
तुका म्हणे एका भावें भजा हरी । कांति ते दुसरी रूप एक ॥

जे तोंडानें कृष्णाची स्तुति गातात व जे मनांत कृष्णाचें ध्यान करतात, ते कृष्णाच्या ध्यासामुळें कृष्णरूप होतात. निजत, बसत, जेवत असतां त्या त्या कृत्याचा भोक्ता नारायण आहे असें ओळखून तें काम करावें. दळण दळतांना नारायणाचीं गाणीं म्हणावीं. त्याचप्रमाणें कांडतांना व इतर कामें करतांना तसेंच करावें. स्त्रिया असोत वा पुरुष असोत व ते कनिष्ठ जातीचेही असोत, त्यांजवळ भाव असल्यास देवाची प्रीति सर्वांवर सारखी असते. देवाला एकनिष्ठपणानें भजा. मग तुमची कांती वेगळी असली तरी तुमचें व देवाचें रूप एकच आहे.

---

## ४ साधनाबद्दल अज्ञान

### शब्दज्ञान.

( ४२ ) केवळ शब्दज्ञान असणाऱ्यानें तोंडानें कितीही ज्ञान सांगितलें तरी त्यास मोठेपणा मिळत नाहीं.

वांझेनें दाविलें गऱ्हवार लक्षण । चिरगुटें घालून वाथयाला ॥
तेवी शब्दज्ञानी करिती चावटी । ज्ञान पोटासाठीं विकूनियां ॥
बोलाचि च कढी बोलाचा चि भात । जेवुनियां तृप्त कोण जाला ॥
कागदीं लिहितां नामाची साकर । चाटितां मधुर गोडी नेदी ॥
तुका म्हणे जळो जळो ते महंती । नाहीं लाज चित्तीं निसुगाला ॥

निसुग—आळशी, निलाजरा. वाथयाला—ओटी पोटाला.

वांझ बाईनें ओटीपोटापुढें चिरगुटें बांधून गरभारपण दाखवावें अशा चावटपणाच्या उद्योगाप्रमाणेंच, ईश्वरमार्गाविषयीं शाब्दिकज्ञान देणारे गुरु, स्वतःच्या पोटाला मिळविण्याकरितां शाब्दिक ज्ञान सांगून, खऱ्या धर्मज्ञानाच्या बाबतींत चावटपणा करितात. कढी व भात यांचें वर्णन ऐकून कोणाची जेवण्याची तृप्ति होणार आहे ! कागदावर साखर हा शब्द लिहून चाटला तर

मधुररसाची गोडी जिभेस लागणार नाहीं. अशा प्रकारच्या महंतपणाला (गुरूच्या धंद्याला) आग लागो. त्या निलाजऱ्याच्या मनांत लाजेचा अंशच नाहीं असें म्हटलें पाहिजे.

---

## जाणीव

(४३) जो आपणास मोठा समजतो त्यास ईश्वर समजण्यास फार यातना पडतात.जो अतिनम्र होतो त्यास ईश्वराची ओळख सहज होते.

लहानपण दे गा देवा । मुंगी साखरेचा रवा ॥
ऐरावत रत्नथोर । तया अंकुशाचा मार ॥
ज्याचे अंगीं मोठेपण । तया यातना कठीण ॥
**तुका म्हणे जाण । व्हावें लाहनाहुनि लाहन ॥**

देवा, मला लहानपण दे. (नम्र राहाण्यास मदत कर.) मुंगी लहान म्हणून तिला कण कां होईना पण साखरेचा मिळतो. ऐरावत हें रत्न पण तें मोठें असल्यामुळें त्यास अंकुशाचे आघात सोसावे लागतात. ऐश्वर्याबरोबर कठीण यातना असतात. (आपण ज्ञानसंपन्न आहों असें ज्यांना वाटतें त्यांना धर्ममार्ग समजण्यास कठीण यातना होतात.) देवाशीं व जगाशीं अत्यंत नम्र होणें हा सुलभ मार्ग होय, हें या उदाहरणांवरून समजून घ्यावें.

---

(४४) लहान मूल जसें जसें वयानें वाढतें, तसतशी त्याची आई त्याच्याबद्दल कमी काळजी घेते. तसेंच शहाणपणाची जाणीव वाढली कीं, देव काळजी करीत नाही.

धाकुटयाचे मुखीं घास घाली माता । वरी करी सत्ता शाहाणियां॥
ऐसें जाणपणें पाडिलें अंतर । वाढे तों तों थोर अंतराय ॥
दोन्ही उभयतां आपण चि व्याली । आवडीची चाली भिन्न भिन्न॥
तुका म्हणे अंगापासूनि निराळें । निवडिलें बळें रडतें स्तनीं ॥

अंतराय—अडथळा.

आई धाकट्या मुलाचे तोंडांत स्वतः घास घालून त्यास भरवते. पण जें मूल मोठें व शहाणें झालेलें असतें त्याच्यावर सत्ता गाजवते. मोठेपणामुळें हा असा फरक पडतो. जितकें जितकें मोठें व्हावें तितका तितका प्रेमांत अडथळा येतो. एकाच आईची हीं दोन्हीं मुलें, परंतु त्यांच्याशीं वागण्याची तिची आवड वेगवेगळी होते. मोठया व जाणत्या मुलास ती अंगापासून दूर करते, व रडत्या बाळास आपण होऊन प्रेमानें जवळ घेऊन स्तनपान देते. ( अहंभाव ठेविल्यापासून हा असा तोटा होतो.)

---

## बाह्यसोंग

( ४५ ) अवगुण नाहींसे होणें हीच पाप गेल्याची खूण होय.

आली सिंह्स्थपर्वणी । न्हाव्या भटा झाली धणी ॥
अंतरी पापाच्या कोडी । वरिवरि बोडी डोई दाढी ॥
बोडिलें तें निघालें । काय पालटले सांग वहिलें ॥
पाप गेल्याची काय खुण । नाही पालटले अवगुण ॥
भक्ति भावें विण । तुका म्हणे अवघा सीण ॥

धणी—संतोष. कोडी—राशी. वहिलें—लवकर.

सिंह्स्थासारखा फार काळानें येणारा धर्मकार्यांचा शुभकाळ आला असतां, मनुष्य न्हावी व भट यांची धन तेवढी करतो. अंतःकरणांत अनेक पापें तशींच ठेवून, डोक्याचे व दाढीचे केस काढल्यानें बाह्यतः शुद्धतेचा देखावा होतो. वरचे केस काढतां येतात ते निघाले; पण तितक्याच जलद दुसरें काय पालटलें ! केस काढले ही पाप गेल्याची खूण आहे काय ! अवगुण नाहींसे झाले नाहींत तर दुसरी खूण कोणती ! भक्तिभावाशिवाय अशा प्रकारचे सर्व प्रयत्न फुकट शिणविणारे होत.

---

( ४६ ) तीर्थाला जाऊन मनोविकार मोडले नाहींत व शांति, क्षमा, दया, या गुणांनीं मन शुद्ध झालें नाहीं तर तीर्थयात्रा केल्याचा अभिमान कां दाखवावा?

जाऊनिया तीर्था काय तुवां केलें । चर्म प्रक्षाळिलें वरी वरी ॥
अंतरींचें शुद्ध कासयानें जालें । भूषण त्वां केलें आपणया ॥
वृंदावन फळ घोळिलें साकरा । भीतरील थारा मोडे चि ना ॥
तुका म्हणे नाहीं शांति क्षमा दया । तोंवरी कासया फुंदां तुम्ही ॥

चर्म—कातडें. प्रक्षाळिलें—धुतलें. वृंदावन—कडूवृंदावन.
भीतरील—आंतील. फुंदां—गर्वानें फुगतां.

तीर्थयात्रेच्या ठिकाणीं जाऊन तूं काय केलेंस ! तीर्थांत स्नान करून आंगाची वरची कातडी धुतलीस एवढेंच ना ! अंतःकरण कशानें शुद्ध झालें ! तीर्थाला जाणें हें फक्त स्वतःला भूषण मिरविण्याकरितां तूं केलेंस. कडूवृंदावनाचें जात्या कडू फळ साखरेंत कितीही घोळलें तरी त्याचा मुळांतला कडूपणा नाहींसा होत नाहीं. जोंपर्यंत शांति, क्षमा, दया हे गुण आंगीं बाणून अंतःकरण शुद्ध होत नाहीं, तोंपर्यंत धार्मिकपणाचा अभिमान कां बाळगतां !

---

( ४७ ) सोवळें ओवळें, ग्रंथपठन, टाळ, मृदंग, तसेंच पुस्तकी-ज्ञान हीं उपयोगी पडत नाहींत. निर्मळ करणीनेंच हित होतें.

काय बा करीशी सोंवळें ओंवळें । मन नाहीं निर्मळ वाउगें चि ॥
काय बा करीशी पुस्तकांची मोट । घोकितां हृदयस्फोट हातां नये ॥
काय बा करीशी टाळ आणि मृदंग । जेथें पांडुरंग रंगला नाहीं ॥
काय बा करीशी ज्ञानाचिया गोष्टी ।
करणी नाहीं पोटीं बोलण्याची ॥
काय बा करीशी दंभलौकिकातें । हित नाहीं मातें तुका म्हणे ॥

हृदयस्फोट—उरफोड.

तुझें मन निर्मळ नाहीं आणि सोवळें व ओवळें ही निवडानिवड विनाकारण कां करतोस ? पुस्तकांची मोट घेऊन काय करतोस ? तीं घोकून हृदय फुटेल पण तें हातांत येणार नाहीं. पांडुरंगाच्या प्रेमाचा रंग रंगला नाहीं तर टाळ आणि मृदंग घेऊन काय उपयोग ? जोंपर्यंत बोलण्याप्रमाणें अंतःकरणापासून करणी होत नाहीं, तोंपर्यंत ज्ञानाच्या बाह्य सोंगाच्या आणि लौकिकाच्या गोष्टी बोलून काय उपयोग ? त्यानें हित होत नाहीं.

---

( ४८ ) जे जगांत आपला मान होण्यास टिळा, मुद्रा लावतात व मनांत विषयांचें ध्यान करतात ते नरकास जातात.

टिळा टोपी उंच दावी । जगीं मी एक गोसावी ।।
अवघा वरपंग सारा । पोटीं विषयांचा थारा ।।
मुद्रा लावितां कोरोनी । मान व्हावयासी जनीं ।।
तुका म्हणे ऐसे किती । नरका गेले पुढें जाती ।।

टिळा लावून व उंच टोपी घालून कांहीं लोक आपण तेवढे देवाचे सेवक आहों असें दाखवितात. त्यांच्या पोटांत विषयांची आवड तशीच शिल्लक असते. तरीही ते भक्ताचें केवळ बाह्यसोंग आणतात. लोकांत मान मिळविण्याकरितां मुद्रा लावतांनाही त्या कोरून लावतात. अशा अगणित लोकांना आजपर्यंत नरकच मिळाला आहे. येथून पुढेंही तशा आचरणाच्या अनेक लोकांना नरकच मिळणार आहे.

---

( ४९ ) भगवें वस्त्र, जटा, गुहेंतील वास वगैरे देहदंडांनीं ईश्वराचा अनुभव मिळत नाहीं.

भगवें तरी श्वान सहज वेष त्याचा । तेथें अनुभवाचा काय पंथ ।।
वाढवुनि जटा फिरे दाही दिशा । तरी जंबुवेषा सहज स्थिति ।।
कोरोनियां भूमी करिती मधीं वास । तरी उंदरास काय वाणी ।।
तुका म्हणे ऐसें कासया करावें । देहासी दंडावें वाउगेंचि ।।

जंबु—कमी प्रतीचा मनुष्य. (रानावनांत राहणारा.)

कांहीं भक्त भगवें वस्त्र नेसून फिरतात, पण पहा कीं कुत्र्याचा वेषही भगवा असतो. त्यास काय देवाचा अनुभव असतो ? कांहीं जटा वाढवून दाही दिशांस फिरतात. परंतु रानटी मनुष्यें स्वभावतःच तशीं राहतात, त्यांना देवाचा अनुभव नसतो. कांहीं जमीन पोखरून गुहा करून राहातात. उंदीर तसेंच राहातात. म्हणून उंदरांची वाखाणणी करतात काय ? कांहीं फायदा नसतांना देहाला अशा रीतीनें फुकट शीण देण्यांत काय अर्थ आहे ?

---

## अज्ञानी

( ५० ) मनुष्याला मरण आहे हें विसरून लोकांना संसारांत गोडी लागते हें आश्चर्य आहे.

वाटे या जनाचें थोर बा आश्चर्य । न करिती विचार कां हिताचा॥
कोण दम ऐसा आहे यांचे पोटीं । येईल शेवटीं कोण कामा ॥
काय मानुनियां राहिले निश्चिंती । काय जाब देती यमदूतां ॥
**कां हीं विसरलीं मरण बापुडीं । काय यांसी गोडी लागलीसे॥**
काय हातीं नाहीं करील तयासी । काय जालें यांसी काय जाणों ॥
कां हीं नाठविती देवकीनंदना । सुटाया बंधनापासूनियां ॥
काय मोल यासी लागे धन वित्त । कां हें यांचें चित्त घेत नाहीं ॥
तुका म्हणे कां हीं भोगितील खाणी । कां त्या चक्रपाणी विसरलीं॥

हे लोक आपल्या हिताचा विचार कां करीत नाहींत ? त्यांच्याबद्दल मला फार आश्चर्य वाटतें. त्यांच्या पोटांत असा कोणता मोठा आधार आहे? शेवटीं त्यांच्या उपयोगी कोण पडणार आहे कोणास ठाऊक ! कोणत्या विचारानें ते चिंतारहित झाले आहेत ? मरणाच्या वेळीं जाब विचारण्या-करितां देवाचे दूत येतील त्यांस हे कोणता जाब देणार आहेत ! त्यांना इतर गोष्टींत जी इतकी गोडी लागली आहे ती मरण येणार आहे याचा विसर पडल्यामुळें लागली आहे कीं काय ? यांच्या हातीं जी गोष्ट नाहीं तिला हे काय करणार आहेत कोण जाणे ! बंधनापासून सुटण्याकरितां देवकीच्या मुलाला (कृष्णाला) हे आठवीत नाहींत तेव्हां यांस काय झालें

आहे कोणी जाणावें ! यांचें मन देवाकडे कां जात नाहीं ! तसें करण्यास काय संपत्ति खर्च करावी लागते ? देवाला हे कां विसरतात ! आणि पापाच्या खाणी भोगण्याची तयारी कां करितात !

---

( ५१ ) मी कोठील आणि कोण हें न कळल्यामुळें मनुष्य देवाला विसरतो; व तो नरस्तुति करण्यास तयार होतो.

आपुल्या पोटासाटीं । करी लोकांचिया गोष्टी ॥
जेणें घातलें संसारीं । विसरला तो चि हरी ॥
पोटा घाली अन्न । न म्हणे पतितपावन ॥
मी कोठील आणि कोण । हें न कळे ज्यालागून ॥
तुका म्हणे नरस्तुति । करितो भाट त्रिजगतीं ॥

मनुष्य स्वतःच्या पोटाला मिळविण्याकरितां अनेकांची स्तुति करतो. परंतु ज्यानें त्यास या संसारांत घातलें त्यालाच तो विसरतो. ज्याच्या कृपेनें याच्या पोटाला मिळतें त्याला तो पतितांचें पावन करणारा असें म्हणत नाहीं. त्याला मी कोण आणि देवाचा व माझा संबंध काय हें समजत नाहीं. म्हणून तो मनुष्याचा भाट होऊन त्याची स्तुति त्रिजगात करीत राहातो.

---

( ५२ ) स्त्रैण, लोभी, आळशी, खादाड, अविवेकी यांचें आयुष्य व्यर्थ होय.

धिग जीणें तो बाइले आधीन । परलोक मान नाहीं दोन्ही ॥
धिग जीणें ज्याचें लोभावरी मन । अतीतपूजन घडे चि ना ॥
धिग जीणें आळस निद्रा जया फार । अमित आहार अघोरिया ॥
धिग जीणें नाहीं विवेक वैराग्य । झुरे मानालागीं साधुपणा ॥
तुका म्हणे ऐसे धिग जाले लोक । निंदक वादक नरका जाती ॥

ज्याला बायको हेंच सर्वस्व वाटतें त्याचें आयुष्य फुकट होय. त्यास परलोक व मान हीं दोन्हीं मिळत नाहींत. ज्याचें मन केवळ स्वतःला कांहीं मिळविण्याकडे असतें व ज्याचे हातून अतिथिसत्काराचें पुण्य घडत नाहीं त्याचें आयुष्य फुकट होय. ज्याच्या अंगांत आळस असतो, जो झोप फार घेतो, ज्याला पुष्कळ व अयोग्य प्रकारचें खाणें लागतें त्याचें आयुष्य फुकट होय. ज्याच्या अंगांत विवेक व वैराग्य बाणलें नसून जो साधुपणाच्या मानाला हापापलेला असतो, त्याचें आयुष्य फुकट होय. जो केवळ निंदा करण्याचें व वादविवाद करण्याचें काम करितो त्याचें आयुष्य व्यर्थ होय. या सर्वांचें आयुष्य व्यर्थ होय. एवढेंच नव्हे तर ते नरकाला जातात.

---

( ५३ ) कामिक भावना, आणि विषयावर ध्यान असणारास धर्माचें योग्य आचरण समजत नाहीं.

अज्ञानाची भक्ति इच्छिती संपत्ती । तयाचियें चित्तीं बोध कैंचा ॥
अज्ञानाची पूजा कामिक भावना । तयाचिया ध्याना देव कैंचा ॥
अज्ञानाचें कर्म फळीं ठेवी मन । निष्काम साधन तया कैंचे ॥
अज्ञानाचें ज्ञान विषयावरी ध्यान । ब्रह्म सनातन तया कैंचे ॥
तुका म्हणे जळो ऐसियांचें तोंड । अज्ञानाचें बंड वाढविती ॥

अज्ञानी मनुष्य संपत्ति मिळविण्याच्या इच्छेनें देवाची भक्ति करतात. त्यामुळें त्यांच्या चित्तांत खरा बोध कसा येईल ! अज्ञानी मनुष्यें स्वतःची ऐहिक इच्छा तृप्त व्हावी या भावनेनें देवाची पूजा करतात; त्यांना ईश्वराचें ध्यान कसें साधेल ! अज्ञानी मनुष्य कर्म करितो तें स्वतःस चांगलें फळ मिळेल या भावनेनें करितो; त्यास निष्काम कर्म करून ईश्वरसाधन करण्याचें काम कसें साधेल ! अज्ञानी मनुष्यास जगांतील क्षणभर टिकणाऱ्या विषयांत गुंग होण्याचेंच ज्ञान असतें. त्यास कायम टिकणारें असें ईश्वरज्ञान कसें होईल ! अशा तऱ्हेच्या अयोग्य भक्तीचा, अयोग्य पूजेचा, सकाम कर्माचा व अज्ञानाचा प्रसार होण्यास जे मदत करतात त्यांचीं तोंडें बंद होतील किंवा त्यांचें जीवित संपेल तर बरें होईल.

---

(५४) मृगाचे नाभींत कस्तुरी, उसांत साखर, दुधांत लोणी आहे, त्याचप्रमाणें देहांत देव आहे तो पहा.

देहीं असोनियां देव। वृथा फिरतो निदैंव ॥
देव आहे अंतर्यामीं। व्यर्थ हिंडे तीर्थग्रामीं ॥
नाभीं मृगाचे कस्तुरी। व्यर्थ हिंडे वनांतरीं ॥
साखरेचें मूळ ऊंस। तैसा देहीं देव दिसे ॥
दुधीं असतां नवनीत। नेणें तयाचें मथित ॥
**तुका सांगे मूढजना। देहीं देव कां पाहाना ॥**

स्वतःजवळ देव असून मनुष्य असा कमनाशिबी कीं तो देवाच्या शोधांत भलत्या मार्गांनीं हिंडत असतो. देव स्वतःच्या अंतःकरणांत असून त्यास शोधण्यास तो तीर्थांच्या ठिकाणीं जातो. हरिणाच्या बेंबीमध्यें कस्तुरी असते; परंतु ती दुसऱ्या जागीं आहे या भ्रमानें हरीण अनेक रानें भटकत फिरतो. साखर ही उसांत भरलेली असते, त्या रीतीनें देव मनुष्याच्या अंतःकरणांत असतो. लोणी दुधांतच असतें; पण पुष्कळांना तें काढण्याची कला माहीत नसते. देवाला आपल्या देहांतच कां पहात नाहीं !

---

## दुर्जन

(५५) नित्यनेम नाहीं, वाणी अशुभ व असत्य, भूतदया आणि संतांचें पूजन नाहीं अशा लोकांना मनुष्य म्हणतां येत नाहीं.

**कांहीं नित्य नेमावीण। अन्न खाय तो चि श्वान ॥**
वायां मनुष्यपण। भार वाहे तो वृषभ ॥
त्याचा होय भूमी भार। नेणे यातीचा आचार ॥
जाला दावेदार। भोगवी अघोर पितरांसी ॥
अखंड अशुभ वाणी। खरें न बोले स्वप्नीं ॥
पापी तयाहुनी। आणिक नाहीं दुसरा ॥
पोट पोसी एकला। भूतीं दया नाहीं ज्याला ॥

पाठी लागे आल्या । अतिताचे दाराशीं ॥
कांहीं संतांचें पूजन । न घडे तीर्थांचें भ्रमण ॥
यमाचा आंदण । सीण थोर पावेल ॥
तुका म्हणे त्यांनीं । मनुष्यपणा केली हानी ॥
देवा विसरुनी । गेलीं म्हणतां मी माझें ॥

कांहीं चांगलीं धर्मकृत्यें नित्य नियमानें केल्याशिवाय जो मनुष्य अन्न खातो त्याचें जीवित कुतऱ्यासारखें होय. त्याचें मनुष्यपण व्यर्थ होय. तो मनुष्यपणाचा भार व्यर्थ वाहाणारा पशूच होय. आपल्या मनुष्यपणास योग्य असा आचार ज्याच्यानें होत नाहीं, त्याचें या पृथ्वीस ओझेंच होय. आपल्या पूर्वजांचा तो दावेदार म्हटला पाहिजे. कारण त्याच्या कृत्यानें त्याच्या पूर्वजास वाईटपणा येतो. जो केव्हांच खरें बोलत नाहीं व जो नेहमीं वाईट भाषा बोलतो त्याच्याइतका पापी दुसरा कोणी नाहीं. असा मनुष्य फक्त स्वतःच्या कुटुंबाच्या पोषणाकरितां खपतो. इतर सर्व जीवांची त्यास दया येत नाहीं. असा मनुष्य दारीं आलेल्या भिकाऱ्याचे पाठीस लागतो; त्याच्या हातून सज्जनांची सेवा होत नाहीं; किंवा पवित्र ठिकाणास तो जात नाहीं. तो यमाच्या ताब्यांत जाऊन दुःखें भोगतो. अशा वागणुकीच्या लोकांनीं मनुष्यपणास दूषण आणलें आहे. जें काय माझ्या मदतीनें जगांत घडतें त्याचें कर्तृत्व माझ्याकडे आहे व मी काय मिळवीन तेंही माझ्याकरितां आहे असें ठरवून ते देवाला विसरले आहेत.

---

( ५६ ) दुर्जन परदुःखाकडे लक्ष न देतां दुसऱ्याचे गळे कापतो व आपल्या दुःखाचे वेळीं मात्र रडत बसतो.

धिग तो दुर्जन नाहीं भूतदया । व्यर्थ तया माया प्रसवली ॥
कठिण हृदय तया चांडाळाचें । जो नेणें पराचें दुःख कांहीं ॥
आपुला हा प्राण तैसे सकळ लोक । न करी विवेक पशु जैसा ॥
तुका म्हणे सुखें कापीतसे गळे । आपुलिया वेळे रडतसे ॥

ज्याला दुसऱ्या जीवाबद्दल दया येत नाहीं त्या वाईट मनुष्याचें जिणें व्यर्थ होय. त्याचा जन्म विनाकारण झाला. ज्याला दुसऱ्याचें थोडेंही दुःख जाणतां येत नाहीं, त्याचें अंतःकरण कठीण असल्यामुळें तो चांडाळ होय. आपल्या प्राणाला आपण जपतों तसेंच जगांतील जीवांच्या प्राणास आपण जपलें पाहिजे, हा विवेक त्यास करतां येत नाहीं, तेव्हां हा पशूच समजावयाचा. हा दुसऱ्यांचे गळे कापतो तेव्हां ह्यास आनंद होतो. आणि याचा गळा कापला जातो तेव्हां मात्र ह्यास दुःख होतें.

---

(५७) पापाचे डोंगर रचतांना दुर्जन भीत नाहीं. आणि स्वतःवर कठीण प्रसंग आला कीं, आपलीं कर्मे विसरून देवाला बोल लावतो.

**पापी तो नाठवी आपुल्या संचिता। ठेवी भगवंता वरी बोल॥**
**भेईना करितां पापाचे डोंगर। दुर्जन पामर दुराचारी॥**
**नाठवी तो खळ आपुली करणी। देवासी निंदोनी बोलतसे॥**
**तुका म्हणे त्याच्या तोंडा लागो काटी। नाहीं जगजेठी जया चित्तीं॥**

आपल्या गेल्या जन्मींच्या कृतकर्मांचीं फळें भोगिलीं पाहिजेत याची जाणीव न ठेवतां पापी मनुष्य देवाला दोष देऊं लागतो. अनेक पापें करतांना तो भीत नाहीं. त्या दुष्टाला आपलीं वाईट कृत्यें आठवत नाहींत. आपल्या इच्छेविरुद्ध झाल्यास तो देवाची निंदा करण्यास तयार होतो. ज्याचे मनांत विश्वाचें पोषण करणाऱ्याबद्दल आदर नाहीं, त्याच्या तोंडाला काट्यांचें जाळें लागलेलें पुरवलें.

---

(५८) जो स्वतः शुद्ध नाहीं त्यास सर्व खोटेच दिसतात. पापी असतो त्याला जगांत पापच दिसतें.

**आंधळ्यासि जन अवघे चि आंधळे। आपणासि डोळे दृष्टी नाहीं॥**
**रोग्या विषतुल्य लागे हें मिष्टान्न। तोंडासि कारण चवी नाहीं॥**
**तुका म्हणे शुद्ध नाहीं जों आपण। तया त्रिभुवन अवघें खोटें॥**

आंधळ्याला सर्व लोक आंधळे वाटतात कारण त्याला डोळे हे कसे ते पहावयास मिळालेले नसतात. उत्तम चवदार अन्न रोग्याला विषासारखें लागतें, कारण त्याच्या तोंडास तेव्हां चव नसते. ( त्याप्रमाणेंच ) जो स्वतः शुद्ध नाहीं, त्याला जगांत सर्व खोटेच आहेत असें वाटतें.

---

( ५९ ) नरनारी जमवून शकून सांगणारे व आंगांत भुतें आणणारे याजपाशीं गोविंद नसतो.

डोई वाढवूनि केश । भूतें आणिती अंगास ॥
तरी ते नव्हति संतजन । तेथें नाहीं आत्मखुण ॥
मेळवूनि नरनारी । शकुन सांगती नानापरी ॥
तुका म्हणे मैंद । नाहीं त्यापासीं गोविंद ॥

आत्मखुग—देवाचा अनुभव असल्याची खूण. मैंद—ठकविणारे.

डोक्याच्या जटा वाढवून आंगांत भुतें येतात असें जे दाखवितात ते संतांच्या कोटींतील नव्हत. असें करणाऱ्यांजवळ आत्मप्रचीति नसते. बायका-पुरुष जमाकरून जे अनेक प्रकारचे शकुनाचे उपाय सांगतात ते लबाड होत. त्यांना देवाचें ज्ञान नसतें. ( त्यांपासून देव जाणण्याचा मार्ग कळणार नाहीं.)

---

( ६० ) मनांत कामक्रोध आशापाश शिल्लक असून बाह्यतः विरक्ति दाखविणारांच्या नादीं लागणारे संसारसागरांत वाहून जातात.

संतचिन्हें लेउनि अंगीं । भूषण मिरविती जगीं ॥
पडिले दुःखाचे सागरीं । वाहवले भवपुरीं ॥
काम क्रोध लोभ चित्तीं । वरी दाविती विरक्ती ॥
आशापाशीं बांधोनि चित्त । म्हणती जालों आम्ही मुक्त ॥
त्यांचे लागले संगती । जाली त्यांसी ते चि गति ॥
तुका म्हणे शब्दज्ञानें । जग नाडियेलें तेणें ॥

संतपणाचीं भूषणें अंगावर घालून आपण संत आहों असें ढोंगी लोक दिमाखानें मिरवितात. परंतु ते स्वतः दुःखाच्या समुद्रांतच पडलेले असतात (त्यांना ईश्वरसाक्षात्काराचा आनंद मुळींच माहीत नसतो.) व ते या संसाराच्या पुरांत इतरासारखेंच वहावतात. वरून विरक्तीचें सोंग आणीत असले तरी त्यांचे चित्तांत काम, क्रोध, लोभ हे शिल्लकच असतात. आशांच्या पाशांत त्यांचें चित्त सापडलेलें असून ते आपण मुक्त आहों असें म्हणतात. अशांच्या संगतीस जे लागतात त्यांची तीच गति होते. असे ढोंगी मनुष्य (गुरु) शब्दज्ञान वाढवून जगाला भलत्या मार्गांत अडकवितात.

---

( ६१ ) ऋद्धिसिद्धींचें साधक अधोगतीला जातात.

सांगों जाणती शकुन । भूत भविष्य वर्तमान ॥
त्यांचा आम्हांसी कंटाळा । पाहों नावडती डोळां ॥
रिद्धिसिद्धींचे साधक । वाचासिद्ध होती एक ॥
तुका म्हणे जाती । पुण्यक्षयें अधोगती ॥

वाचासिद्ध—बोलतील ते घडवून आणणारे.

जे शकून सांगण्याचा व मागें कोणत्या गोष्टी झाल्या व पुढें कोणत्या होणार यांचा अंदाज सांगण्याचा आव आणतात, त्यांचा आम्हांस फार कंटाळा आहे. ते दृष्टीसही पडूं नयेत असें वाटतें. कांहीं साधक ऋद्धि-सिद्धि व कांहीं वाचासिद्धि मिळविण्याच्या प्रयत्नांत असतात. असल्या साधकांचें पुण्य लवकरच संपतें व ते अधोगतीला जातात.

---

( ६२ ) वर्षासन लावणारे व रांडापोरांना गोवून बळेंच उपदेश करणारे संत हे पोटभरे संत होत.

घालूनिया मध्यवर्ती । दाटुनि उपदेश देती ॥
ऐसें पोटभरे संत । तयां कैंचा भगवंत ॥
रांडापोरांतें गोविती । वर्षासन ते लाविती ॥
जसे बोलती निरोपणीं । तैसी न करिती करणी ॥
तुका म्हणे तया । तमोगुणियाची क्रिया ॥

गोविती—गुंतवतात. निरोपणीं—उपदेशांत.

कांहीं लोक संतपणाचा वेष घेतात आणि कोणालातरी मध्यस्थ घालून लोकांना बळेंबळेंच उपदेश घ्यावयास लावतात. अशा पोट भरण्याचा उद्योग करणाऱ्या संतांना देवाबद्दल काय अनुभव असणार ! ते बायका-पोरांना आपल्या जाळ्यांत पकडतात व वार्षिक देणग्यांचीं वचनें घेतात. स्वतः पुराणांतून धर्माचा जो उपदेश ते सांगतात त्याप्रमाणें स्वतः मुळींच वागत नाहींत. त्यांच्या सर्व कृति तमोगुणाच्याच दिसून येतात.

---

# ५ उपदेश

—:o:—

## विवेक-वैराग्य

( ६३ ) चराचरावर देवाची सत्ता असल्यामुळें त्याचें भजन चुकवूं नका.

**चाले हें शरीर कोणाचिये सत्ते। कोण बोलवितें हरी विण॥**
**देखवी ऐकवी एक नारायण। तयाचें भजन चुको नका॥**
**मानसाची देव चालवी अहंता। मी चि एक कर्ता म्हणों नये॥**
**वृक्षाचें ही पान हाले त्याची सत्ता। राहिली अहंता मग कोठें॥**
**तुका म्हणे विठो भरला सबाह्य। उणें काय आहे चराचरीं॥**

आपल्या शरीराचे व्यवहार कोणाच्या सामर्थ्यानें होतात ! देवाशिवाय दुसरें कोण आपणांस बोलण्याचें सामर्थ्य देणार आहे ! आपणांस पहाण्याचें व ऐकण्याचें सामर्थ्य त्याच्यामुळेंच आहे. म्हणून देवाचें भजन चुकतां कामा नये. देवाच्या मदतीनेंच मनुष्याला कर्तृत्वाचा मान मिळतो म्हणून आपणां-कडून घडलेल्या एखाद्या चांगल्या कृत्याचा कर्ता मीच असें म्हणूं नये. झाडाचें पान हालतें हेंही देवाचें सामर्थ्य आहे. तेव्हां अहंपणा मिरविण्यास जागा कोठें आहे ! विठ्ठल हा अंतर्बाह्य भरलेला आहे. त्याची सत्ता नाहीं अशी चर व अचर वस्तु नाहीं.

---

(६४) देह व धन यांचे आपण निमित्ताचे मालक आहोंत, हें जाणून देवास शरण जा.

**आलिया संसारा उठा वेग करा। शरण जा उदारा पांडुरंगा ॥**
**देह हें देवाचें धन कुबेराचें। येथें मनुष्याचें काय आहे ॥**
**देता देवविता नेता नेवविता। येथें याची सत्ता काय आहे ॥**
**निमित्याचा धनी केला असे प्राणी। तुका म्हणे मी म्हणोनि व्यर्थ गेला ॥**

तुम्ही या नाशिवंत संसारांत आलां आहां म्हणून उठा व त्वरा करून उदार पांडुरंगाला शरण जा. शरीर हे देवाच्या मालकीचें आहे व संपत्ति ही कुबेराच्या मालकीची आहे. या दोहोंवरही मनुष्याची मालकी नाहीं. शिवाय हीं देणारा व देवविणारा, नेणारा व नेवविणारा पांडुरंग आहे. तेथें आपलें सामर्थ्य काय चालतें ! मनुष्य हा शरीराचा व धनाचा थोड्या काळापुरता निमित्त मात्र मालक आहे. असें असून मी धनी व सर्व माझें माझें असें तो म्हणतो, आणि त्यामुळें त्याचा जन्म फुकट जातो.

---

(६५) मनुष्यजन्म दुर्लभ आहे. तो कामभोगांत घालविला तर मनुष्यजन्माचा दुरुपयोग केल्याचें पाप लागतें.

**आयुष्य वेंचूनि कुटुंब पोसिलें। काय हित केलें सांग बापा ॥**
**फुकाचा चाकर जालासी काबाडी। नाहीं सुख घडी भोगावया॥**
**दुर्लभ मनुष्यजन्म कष्टें पावलासी। दिला कुटुंबासी कामभोग॥**
**तुका म्हणे ऐसें आयुष्य नासिलें। पाप तें सांचिलें पतनासी ॥**

काबाडी—काबाडकष्ट करणारा.

तूं कुटुंब पोसण्यांतच सर्व आयुष्य घालविलेंस. आयुष्यांत खऱ्या फायद्याची कोणती गोष्ट केलीस ती सांग ! केवळ चाकरासारखें काबाडकष्ट सर्वदां केलेस व खरें सुख भोगण्यास तुला थोडा वेळही मिळवितां आला नाहीं. मनुष्यजन्म मिळण्यास कठीण; तो अनेक कष्टांनीं (पुण्य करून) तुला मिळाला, आणि फक्त कुटुंबाच्या हौशी पुरविण्यांत तूं तो खर्च केलास.

अशा रीतीनें आयुष्याचा वाईट उपयोग करून तूं पुनः पतन होण्यास पाप मात्र सांठवून ठेविलें आहेस.

---

( ६६ ) भावानें मन शुद्ध करा आणि देवाच्या चिंतनानें आपलें हित साधा.

**आतां तरी पुढें हाचि उपदेश । नका करूं नाश आयुष्याचा ॥**
**सकळांच्या पायां माझें दंडवत । आपुलालें चित्त शुद्ध करा ॥**
**हित तें करावें देवाचें चिंतन । करूनियां मन शुद्ध भावें ॥**
**तुका म्हणे हित होय तो व्यापार । करा काय फार शिकवावें ॥**

आपल्या आयुष्याचा नाश करूं नका, एवढाच उपदेश मला करावयाचा आहे. सर्वांच्या पायां पडून मी विनंती करितों कीं, तुम्ही आपलें चित्त शुद्ध करा. भाव धरून व आपलें मन शुद्ध करून देवाचें चिंतन करणें हेंच हितकारक होय. ज्या उद्योगानें हित होईल तो उद्योग करा. याशिवाय आणखी वेगळें असें काय शिकवावें !

---

( ६७ ) काळापासून वाचविणें हें देवाशिवाय दुसऱ्यास शक्य नाहीं.

**नको नको मना गुंतूं मायाजाळीं। काळ आला जवळी ग्रासावया॥**
**काळाची हे उडी पडेल बा जेव्हां । सोडविना तेव्हां मायबाप ॥**
**सोडवीना राजा देशींचा चौधरी । आणीक सोइरीं भलीं भलीं ॥**
**तुका म्हणे तुज सोडवीना कोणी । एका चक्रपाणीवांचूनियां ॥**

ग्रासावया—खाण्यास, नाहींसा करण्यास. कामीन—बायको.
चौधरी—अधिकारी.

हे मना, तूं जगाच्या मोहपाशांत गुंतून राहूं नको. कारण काळ तुला नाहींसा करण्यास सारखा जवळ येत आहे. जेव्हां काळ तुझ्यावर उडी घालील तेव्हां त्याच्या तडाक्यांतून तुझे आईबाप तुला सोडवूं शकणार

नाहींत. राजा किंवा प्रांताचा अधिकारी किंवा मोठमोठे योग्यतेचे नातेवाईक यांच्याजवळही तुला सोडविण्याचें सामर्थ्य नाहीं. काळाच्या तडाक्यांतून सोडविण्याचें सामर्थ्य एकट्या चक्रपाणीजवळ आहे.

---

( ६८ ) धनाचें भाग्य अशाश्वत आहे. तें नसेल तेव्हां अगदी जवळचे नातलगही सोडून जातात.

धनवंतालागीं । सर्वमान्यता आहे जगीं ॥
माता पिता बंधुजन । सर्व मानिती वचन ॥
जंव मोठा चाले धंदा । तंव बहिण म्हणे दादा ॥
सदा शृंगारभूषणें । कांता लवे बहुमानें ॥
तुका म्हणे धन । भाग्य अशाश्वत जाण ॥

धनवंताला सर्वांकडून मान्यता मिळते. पैसा असला कीं, आईबाप, भाऊ व भोंवतालचे लोक त्याच्या म्हणण्याप्रमाणें चालतात. धंदा जर चांगला चालत असला तरच बहिणीला दादाची आठवण होते, व ती दादा दादा करते. बायकोला शृंगार भूषणांनीं लवविली तरच ती आपणांस मान देण्याकरितां लवते. अशा रीतीनें हें भाग्य धनाचें असल्यामुळें अशाश्वत आहे.

---

## व्यवहार-बोध

( ६९ ) ज्या तोंडांत सदा रामनाम असतें, तें तोंड मंगळ होय.

चिंतनासी न लगे वेळ । सर्व काळ करावें ॥
सदा वाचे नारायण । तें वदन मंगल ॥
पढिये सर्वोत्तमा भाव । येथें वाव पसारा ॥
ऐसे उपदेशी तुका । अवघ्या लोकां सकळां ॥

वाव—व्यर्थ. पढिये—आवडता. सर्वोत्तमा—देवाला.

देवाच्या चिंतनास वेगळा ठराविक वेळ लागत नाहीं. तें सर्वदा करावें. ज्या तोंडानें सदा नारायणाचें नांव घेतलें जातें, तें तोंड मंगलकारक होय. सर्वोत्तमाला ( देवाला ) भाव हाच प्रिय आहे. इतर सर्व व्यर्थ आहे. मला लोकांना एवढाच उपदेश करावयाचा आहे.

---

( ७० ) हृदयांत देवाचे चिंतन असल्यावर सर्व शुभ आहे.

अवघा तो शकुन । हृदयीं देवाचें चिंतन ॥
येथें नसतां वियोग । लाभा उणें काय मग ॥
संग हरीच्या नामाचा । शुचिर्भूत सदा वाचा ॥
**तुका म्हणे हरिच्या दासां । शुभकाळ अवघ्या दिशा ॥**

हृदयांत देवाचें चिंतन हाच उत्तम शकून होय. ( पुढें लाभ मिळणार आहे हें दाखविणारी उत्तम खूण होय.) तुम्हीं देवाचें चिंतन सोडलें नाहीं तर लाभाला काय उणें पडणार आहे ! देवाचें नांव घेण्याचा छंद लागला कीं, वाणीची पूर्ण शुद्धता होते. हरीच्या भक्ताला सर्व काळ व सर्व दिशा शुभ देणाऱ्या ( कल्याण करणाऱ्या ) होतात.

---

( ७१ ) उत्तम व्यवहारानें धन मिळविणारा, परोपकार करणारा, भूतदया व शांति असलेला आणि परस्त्रिया व परनिंदा मनांत न आणणारा हा खरा गृहस्थाश्रमी होय.

**जोडोनिया धन उत्तम वेव्हारें । उदास विचारें वेच करी ॥**
उत्तम चि गति तो एक पावेल । उत्तम भोगील जीव खाणी ॥
परउपकारी नेणे परनिंदा । परस्त्रिया सदा बहिणी माया ॥
भूतदया गाईपशूचें पालन । तान्हेल्या जीवन वनामाजी ॥
शांतिरूपें नव्हे कोणाचा वाईट । वाढवी महत्त्व वडिलांचे ॥
तुका म्हणे हें चि आश्रमाचें फळ । परमपद बळ वैराग्याचें ॥

जीवन—पाणी.

जो उत्तम व्यवहारानें धन मिळवून चित्तास खेद होऊं न देतां तें खर्च करितो त्याला चांगली गति व चांगले जन्म मिळतील. जो परोपकार करणारा आहे, परनिंदा करीत नाहीं, जो परस्त्रियांना आई-बहिणीप्रमाणें मानतो, सर्व प्राण्यांवर दया करितो, गाई व पशु यांचें पालन करितो, रानांत तान्हेल्यांना पाणी मिळेल अशी व्यवस्था करतो, शांत असून कोणाचेंही वाईट करीत नाहीं, आपल्या वाडवडिलांची कीर्ति वाढवितो, तो गृहस्थाश्रम सफल करतो आणि वैराग्याचें खरें सामर्थ्य मिळवितो.

---

( ७२ ) परनारी, परनिंदा, परद्रव्य हीं सोडून आणि संतांच्या वचनावर विश्वास ठेवून ईश्वरस्मरणपूर्वक सत्य आचरलें कीं देव मिळतो.

पराविया नारी माउलीसमान । मानिलिया धन काय वेचे ॥
न करितां परनिंदा परद्रव्य अभिलाष। काय तुमचें यास वेचे सांगा ॥
बैसलिये ठायीं म्हणतां रामराम । काय होय श्रम ऐसें सांगा ॥
संतांच्या वचनीं मानितां विश्वास । काय तुमचें यास वेचे सांगा॥
खरें बोलतां कोण लागती सायास । काय वेचे यास तुमचे सांगा॥
तुका म्हणे देव जोडे याचसाटीं । आणीक ते आटी न लगे कांहीं॥

आटी—प्रयत्न. साटी—मोबदला.

दुसऱ्याची स्त्री आईसमान मानण्यास काय धन वेचावें लागतें ! परनिंदा केली नाहीं व दुसऱ्याच्या द्रव्याची इच्छा धरली नाहीं तर त्यास काय खर्च करावा लागतो ! बसलेल्या ठिकाणींच राम, राम म्हणण्यास कितीसे श्रम लागतात ! संतांच्या वचनावर विश्वास ठेवला तर तुमच काय बुडतें ! खरें बोलण्यास कितीसे श्रम घ्यावे लागतात व खरें बोलण्यानें कोणतें नुकसान होतें ! वरील बाबी केल्या कीं, त्यांचा मोबदला म्हणून देवाची जोड होते. तिच्याकरितां आणखी दुसरे श्रम करावे लागत नाहींत.

---

( ७३ ) जो परद्रव्य व परनारी यांचा अभिलाष तसेंच दंभ, तृष्णा, दुष्टांची संगति वगैरे सोडतो, आणि शिवाय शुभवाचेचा, संत-

समागम करणारा व जनमित्र होतो, त्या मनुष्याच्या कल्याणाची चिंता देव वाहातो.

इतुलें करीं भलत्या परी। परद्रव्य परनारी ॥
सांडुनि अभिलाष अंतरीं। वर्ते वेव्हारीं सुखरूप ॥
न करीं दंभाचा सायास। शांती राहें बहुवस ॥
जिव्हे सेवीं सुगंधरस। न करीं आळस रामनामीं ॥
जनमित्र होईं सकळांचा। अशुभ न बोलावी वाचा ॥
संग न धरीं दुर्जनाचा। करीं संतांचा सायास ॥
करिसी देवाविण आस। अवघी होईल निरास ॥
तृष्णा वाढविसी बहुवस। कधीं सुखास न पावसी ॥
धरुनी विश्वास करीं धीर। करितां देव हाचि निर्धार ॥
तयाचा वाहे योगक्षेमभार। नाहीं अंतर तुका म्हणे ॥

बहुवस—पुष्कळ.

दुसऱ्याचें धन व दुसऱ्याची बायको यांना त्याज्य समज व मग संसारांत खुशाल कसाही राहा. बाह्यसोंगाच्या मार्गाची धडपड टाकून मनाची चांगली शांतता मिळवून राहा. जिभेनें रामनामाचा उत्तम रस चाख. रामनाम घेण्याचे कामीं आळस करूं नको. सगळ्या लोकांचा मित्र हो व तोंडानें वाईट बोलूं नको. वाईट लोकांची संगती न धरतां चांगल्या मनुष्यांची संगती धर. देवाशिवाय इतर कांहीं मिळविण्याची इच्छा धरशील तर ती सिद्धीस जाणार नाहीं. अनेक प्रकारची तृष्णा वाढविशील तर तुला केव्हांही सुख होणार नाहीं. देवावर विश्वास ठेवून धीर धरून रहा. देवावर निर्धारानें विश्वास ठेवल्यास तो तुमचे योग आणि क्षेम यांची काळजी घेतो. तो तुम्हांला दूर करणार नाहीं.

---

(७४) आशा नाहींशी करतां येत नसेल तर, संसारांतून निघूं नये.

आशा हे समूळ खाणोनि काढावी। तेव्हांचि गोसावी व्हावें त्यांनीं॥
नाहीं तरि सुखें असावें संसारीं। फजिती दुसरी करूं नये ॥

आशा मारूनियां जयवंत व्हावें। तेव्हां चि निघावें सर्वांतूनि॥
तुका म्हणे जरीं योगाची तांतडी। आशेची बीबुडी करीं आधीं॥

गोसावी—विरक्त. तांतडी—घाई, तीव्र इच्छा. बिबुडी—बीमोड.

ज्यांनीं आपल्या मनांत आशेचा लेशही ठेविला नसेल त्यानींच विरक्त व्हावें. आशा समूळ काढून टाकतां येत नसेल तर सांसारिक कर्मे करणें हेंच सुखाचें आहे. (संसारांत चांगल्या रीतीनें राहातां येत नाहीं ही एक फजीती आहेच.) विरक्त म्हणून बाहेर पडून विरक्तता न साधल्यामुळें आणखी फजीती करून घेऊं नये. आशा या शत्रूचा निःपात करून तिच्यावर जय मिळवावा व मग सांसारिक कर्मांतून अंग काढून घ्यावें. देवाशीं योग करण्याची तीव्र इच्छा असेल तर प्रथम आशेचा बींमोड कर.

---

(७५) सर्व जीवांत देव आहे तेव्हां पशूंची हत्या कशी करतां?

जीवे जीव नेणे पापी सारिखाची। नळी दुजयाची कापूं बैसे॥
आत्मा नारायण सर्वां घटीं आहे। पशुंमध्यें काय कळों नये॥
देखत हा जीव हुंबरे बरडत। निष्ठुराचे हात वाहाती कैसे॥
तुका म्हणे तया चांडाळासी नर्क। भोगिती अनेक महादुःखें॥

नळी—नरडें. घटीं—शरिरांत.

आपल्या जीवासारखाच दुसऱ्याचा जीव आहे हें पापी मनुष्याला समजत नाहीं, आणि तो दुसऱ्याचें नरडें कापावयास बसतो. नारायण हा आत्म्याच्यारूपानें सर्वांच्या शरिरांत आहे, तेव्हां तो पशूमध्येंही आहे हें त्यास समजूं नये काय! या दुष्टाला पहातांच पशूचा जीव ओरडून हंबरडा फोडतो तरी या निष्ठुराचे हात त्याला मारण्यास कसे वाहावतात! अशा चांडाळांना अधोगति मिळते व त्यांना महादुःखें भोगावीं लागतात.

---

(७६) दया, क्षमा, शांति, त्याचप्रमाणें भक्ति व मनोनिग्रह नाहीं अशा कुटिल अंतःकरणाच्या माणसानें भक्तीचीं बाह्यसोंगें करूं नयेत.

सदा सर्वकाळ अंतरीं कुटिल । तेणें गळां माळ घालूं नये ॥
ज्यासी नाहीं धर्म दया क्षमा शांति । तेणें अंगीं विभूती लावूं नये॥
जयासी न कळे भक्तीचें महिमान । तेणें ब्रह्मज्ञान बोलों नये ॥
ज्याचें मन नाहीं लागलें हातासी । तेणें प्रपंचासी टाकूं नये ॥
तुका म्हणे ज्यासी नाहीं हरिभक्ति । तेणें भगवें हातीं धरूं नये ॥

कुटिल—वाईट. विभूति—भस्म. महिमान—महत्त्व, महिमा.

ज्याच्या अंतःकरणांत वाईट विचार येतात, त्यानें गळ्यांत माळ घालूं नये. ज्याच्याजवळ दया, क्षमा, शांति नाहीं व ज्याचें आचरण धर्मास मान्य नाहीं त्यानें अंगाला भस्म लावूं नये. ज्याला भक्तीची योग्यता समजली नाहीं त्यानें ब्रह्मज्ञानाच्या गोष्टी बोलूं नयेत. ज्याला आपल्या मनावर ताबा ठेवितां येत नाहीं त्यानें संसार सोडूं नये. ज्याचे मनांत देवाची भक्ति चांगली बाणली नाहीं, त्यानें भगवें हातांत घेऊं नये.

---

( ७६ ) आनन्द व दुःख सारखें मानतां आल्याशिवाय आपण मुक्त झालों असें म्हणूं नये.

आपुलिया आंगें तोडी मायाजाळ । ऐसें नाहीं बळ कोणापाशीं ॥
रांडापोरें त्याग करी कुटुंबाचा । नावरे हे वाचा आणि मन ॥
हर्षामर्ष हे जों नाहीं जिराले । तोंवरी हे केले चार त्यांनीं ॥
मुक्त जालों ऐसें बोलों जाये मुखें । तुका म्हणे दुःखें बांधला तो ॥

हर्षामर्ष—सुखदुःख. चार—वेडेचार.

या संसारांतील मायेचें जाळें स्वतःच्या प्रयत्नानें तोडूं शकेल इतकें सामर्थ्य कोणापाशीं नसतें. कोणी बायकामुलें व कुटुंबांतील इतर मनुष्यें यांना सोडतात. परंतु त्यांना आपल्या वाणीवर व मनावर ताबा ठेवितां येत नाहीं. आनंद व शोक या भावनांपासून जोंपर्यंत मुक्त होतां येत नाहीं तोंपर्यंत बायकांमुलांपासून वेगळें राहाणें वगैरे केवळ वेडेपणाचें वागणें होय. जो तोंडानें मी मुक्त झालों असें म्हणतो तो खरोखर मुक्त नसून बन्धनाच्या दुःखाची तयारी करतो.

---

( ७७ ) पांडव, प्रल्हाद, सुदामा यांच्याप्रमाणें आपणांपुढें दुःखाचे डोंगर आले तरी देवाला विसरूं नये.

पहा ते पांडव अखंड वनवासी । परि त्या देवासी आठविती ॥
प्रल्हादासी पिता करितो जाचणी । परि तो स्मरे मनीं नारायण ॥
सुदामा ब्राह्मण दरिद्रें पीडिला । नाही विसरला पांडुरंगा ॥
तुका म्हणे तुझा न पडावा विसर । दुःखाचे डोंगर जाले तरी ॥

पांडवांनीं पुष्कळ काळ सारखा वनवासांत काढला. परंतु ते देवाची आठवण करीत होते. प्रल्हादाला त्याचे बापानें पुष्कळ छळिलें. परंतु तो मनांत देवाला स्मरत होता सुदामा ब्राह्मण दारिद्र्यानें पीडला होता. परंतु तो देवाला विसरला नाहीं. दुःखाचे डोंगर आले तरी देवाचा विसर पडूं नये.

---

( ७८ ) सांसारिक सुखाचा अभाव असला किंवा विपत्ति आल्या तरी देवाचें चिंतन करावें.

न मिळो खावया न वाढो संतान । परि हा नारायण कृपा करो ॥
ऐसी माझी वाचा मज उपदेशी । आणि लोकांसी हे चि सांगे ॥
विटंबो शरीर होत कां विपत्ति । परि राहो चित्तीं नारायण ॥
तुका म्हणे नासिवंत हें सकळ । आठवे गोपाळ तें चि हित ॥

खावयाला नसो किंवा मुलें बाळें नसोत, देवाची कृपा मात्र असावी. मी माझ्या मनाला हा उपदेश सांगतो व म्हणून लोकांसही तोच सांगतो. शरिराचे हाल होवोत अथवा जगांतील इतर संकटें येवोत. अंतःकरणांतील नारायण नाहींसा होऊं नये. संतति किंवा संपत्ति सतत टिकणारी नाहींत. देवाची आठवण व कृपा ह्याच कल्याणकारक आहेत.

---

( ७९ ) देहाचे जे भोग आहेत ते पूर्वी केलेल्या कर्मांचीं फळें होत. त्याबद्दल देवाला दोष देऊं नये.

पापाचीं संचितें देहासीं दंडण । तुज नारायणा बोल नाहीं ॥
पेरी कडू जिरें मागें अमृतफळें । अर्का वृक्षा केळें कैसीं येती ॥
सुख अथवा दुःख भोग हा देहाचा । नास हा ज्ञानाचा करूं नये ॥
तुका म्हणे आतां देवा कां रुसावें । मनासी पुसावें काय केलें ॥

अमृतफळ—आंबा, गोडफळ. अर्कवृक्ष—रुईचें झाड.

आपण पाप सांठवून ठेविलें म्हणून आपणांस क्लेश होतात. त्याचा बोल देवाकडे नाहीं. कडू जिरें पेरून आम्ही अमृताचीं फळें मागतों. रुईच्या झाडाला केळीं कशीं लागतील ? सुख किंवा दुःख हा देहाचा भोग आहे; त्यामुळें खरें ज्ञान सोडूं नये. देवावर कशाला रुसावें ? आपण आजपर्यंत काय केलें तें मनाला विचारावें.

---

( ८० ) ठकाशीं प्रसंग असतां वाघ कोल्ह्याचाच दाखला घेतला पाहिजे.

वाघें उपदेशिला कोल्हा । सुखें खाऊं दे रे मला ॥
अंतीं मरसी तें न चुके । मज कां मारितोसि भुके ॥
येरु म्हणे भला भला । निवाड तुझ्या तोंडें जाला ॥
देह तो जाणार । घडेल हा उपकार ॥
येरु म्हणे मनीं । ऐसें जावें समजोनि ॥
गांठी पडली ठका ठका । त्याचा धर्म बोले तुका ॥

येरु—दुसरा.

वाघानें कोल्ह्याला असा उपदेश सांगितला कीं, तूं केव्हां तरी मरणारच आहेस, तेव्हां तुला खाण्याची परवानगी मला आनंदानें दे. मला भुकेनें कां मारतोस ! ( मला मारण्याचें पाप तुला लागेल.) कोल्ह्यानें उत्तर केलें कीं तूं आपल्या तोंडानेंच याचा निकाल चांगला दिला आहेस. तुझाही देह केव्हां तरी जाणारच आहे. तेव्हां मला न खाण्यानें परोपकार केल्याचें पुण्य आयतें होत आहे, असें समज म्हणजे झालें. ठकाठकांची गाठ पडली असतां त्यांचा वागण्याचा धर्म मी सांगत आहें.

---

## ६ आश्वासन व समाधान

( ८१ ) मनुष्यानें देवावर विसंबून संसारांतील दुःखें सोसण्यास तयार असावें.

**आलिया भोगासि असावे सादर। देवावरी भार घालूं नये॥**
**मग तो कृपासिंधु निवारी सांकडें। येर तें बापुडें काय रंके॥**
**भयाचिये पोटीं दुःखाचिया रासी। शरण देवासी जातां भलें॥**
**तुका म्हणे नव्हे काय त्या करितां। चिंतावा तो आतां विश्वंभर॥**

भोग—प्रारब्धामुळें आलेला कठीण प्रसंग.

प्रारब्धाप्रमाणें जीं दुःखें येतील तीं सोसण्याचें सामर्थ्य देव देईल ही खात्री ठेवून तीं भोगण्यास तयार असावें. मग देव दयेचा समुद्र असल्यामुळें तो तीं दुःखें आहेत ही भावना नाहींशीं करतो. संकटें नाहींशीं करण्याचे कामीं दुसरे सर्व भिकार दुबळे काय करणार आहेत! भय घेतलें असतां दुःखाचे डोंगर स्वभावतःच येतात. ते ओलांडण्यास देवास शरण जाणें हाच चांगला फायद्याचा उपाय आहे. त्याला करतां येत नाहीं असें काय आहे? म्हणून विश्वाची काळजी वाहाणाऱ्या देवालाच आठवीत जा.

---

( ८२ ) प्राण देवास अर्पण करा म्हणजे त्याच्या सुदर्शनानें सर्व विघ्नें नाहींशीं होतात.

**पडतां जड भारी। दासीं आठवावा हरी॥**
**मग तो होऊं नेदी सीण। आड घाली सुदर्शन॥**
**नामाच्या चिंतनें। बारा वाटा पळती विघ्नें॥**
**तुका म्हणे प्राण। करा देवासी अर्पण॥**

विशेष अडचणींत असतां दासानें देवाचें स्मरण करावें. तो दासाला शिणवीत नाहीं. स्वतः सुदर्शन आडवें करून दासाचें रक्षण करतो. देवाचें चिंतन केलें कीं विघ्नें अनेक वाटांनीं पळ काढतात. मात्र भक्तानें आपला प्राण देवाच्या चरणीं अर्पिला पाहिजे.

---

( ८३ ) अजामीळ, भिल्लीण, वाल्मीकी यांसारखे पापी व नीच समजलेले भक्त ईश्वराचे भजनीं लागल्यावर वंद्य झाले.

**अंगीकार ज्याचा केला नारायणें । निंद्य तेंही तेणें वंद्य केलें ॥**
**अजामेळ भिल्ली तारिली कुंटणी । प्रत्यक्ष पुराणीं वंद्य केली ॥**
**आत्महत्त्याराशी पातकें अपार । वाल्मीक किंकर वंद्य केला ॥**
**तुका म्हणे येथें भजन प्रमाण । काय थोरपण जाळावें तें ॥**

ज्यांना देवानें आपलें म्हटलें ते वाईट आचरणाचे असले तरी त्यास त्यानें पूज्य पदास नेलें आहे. अजामिळाला, भिल्लीणीला व गणिका कुंटि-णीलाही चांगल्या स्थितीस नेल्याचा दाखला पुराणांत आहे. वाल्मिकीनें कित्येक जीवांची हत्या केली होती. परंतु तो देवाचा दास झाल्यावर त्याची योग्यता वाढली. सारांश, देवाला स्मरणें व शरण जाणें ह्याचाच हा परिणाम आहे. नुसत्या मानीव मोठेपणास काय जाळावयाचें !

---

( ८४ ) सर्वव्यापी देव जवळच असतो; म्हणून भय, चिंता आणि उद्वेग धरूं नये. धीर व समाधान हीं असूं द्यावीं.

**हरिचिया भक्ता नाहीं भय चिंता । दुःख निवारिता नारायण ॥**
**न लगे वाहणें संसार उद्वेग । जडों नेदी पांग देवराव ॥**
**असों द्यावा धीर सदा समाधान । आहे नारायण जवळी च ॥**
**तुका म्हणे माझा सखा पांडुरंग । व्यापियेलें जग तेणें एकें ॥**

पांग—कठीण प्रसंग.

देवाच्या भक्ताला भय व चिंता असतां कामा नयेत. भयाचें व चिंतेचें दुःख देव राहूं देत नाहीं. भक्तानें संसारांतील कठीण प्रसंगांची काळजी करूं नये. कारण, देव त्याला संसाराच्या आधीन ठेवीत नाहीं. मनांत नेहमीं धीर व समाधान हीं असावी. ( धीरानें भय, व समाधानानें चिंता नाहींशी होते.) कारण, देव तुम्हांमध्येंच आहे. माझ्या हितकर्त्या पांडुरंगानें एकट्यानें सर्व जग व्यापलें आहे. ( त्याअर्थी तो तुम्हांजवळ आहेच.)

---

( ८५ ) देवाचे हातीं जीव दिला आहे. त्यास योग्य ती गति तो देईल.

**जननी हे जाणे बाळकाचें वर्म। सुख दुःख धर्म जें जें कांहीं॥**
**अंधापुढें जेणें दिधला आधार। त्याचा हा विचार तो चि जाणे॥**
**शरणागता जेणें घातलें पाठीशीं। तो जाणे तेविशीं राखों तया॥**
**कासे लागे तया न लगती सायास। पोहोणार त्यास पार पावी॥**
**तुका म्हणे जीव विठ्ठलाचे हातीं। दिला त्याची गति तो चि जाणे॥**

अगदीं तान्ह्या मुलाचें सुख व दुःख आईस माहीत असतें. त्याला कशाची जरूरी आहे हें तिला समजतें. आंधळ्या मनुष्याला जो आधार देतो तो आंधळ्याबद्दल जी काय काळजी घ्यावयाची ती आपणच घेतो. आंधळ्याच्या गरजा व अडचणी त्याला समजतात. शरण आलेल्या मनुष्याला जो पाठीशी घालतो तो त्याचें रक्षण करण्याची जबाबदारी व उपाय जाणतो. जो पोहतांना दुसऱ्याचा कासेस लागतो त्याला कांहींच श्रम पडत नाहींत. ज्याची कास धरली असेल तो त्यास कांठास पोहोंचविण्याची काळजी घेतो. त्याचप्रमाणें ज्याअर्थी मी आपला जीव विठ्ठलाचे हातीं दिला आहे त्या अर्थी त्या जीवाला योग्य मार्ग दाखवून चांगल्या कडेस पोहोंचविण्याची जबाबदारी आतां विठ्ठलाकडेच आहे.

---

( ८६ ) हरिश्चंद्र, ताराराणी व पांडव यांवरही कठीण प्रसंग आलेले आहेत, तेव्हां येतील त्या प्रसंगास मुकाटयानें तोंड द्या.

**आलें देवाचिया मना। तेथें कोणाचें चालेना॥**
**हरिश्चंद्र ताराराणी। वाहे डोंबा घरीं पाणी॥**
**पांडवांचा साहाकारी। राज्यावरोनि केले दूरी॥**
**तुका म्हणे उगेचि राहा। होईल तें सहज पाहा॥**

देवाच्या योजनेपुढें कोणाचें चालत नाहीं. राजा हरिश्चंद्र व त्याची राणी तारामती सत्वशील असून त्यांना डोंबाच्या घरीं पाणी वाहावें लागलें. श्रीकृष्ण पांडवांना मदत करणारा पण त्यांना राज्य सोडावें लागलें. ज्या

गोष्टी जगांत घडतात त्यांकडे उदासीनतेनें व शांततेनें पहाण्यास शिका. त्यामुळें उद्वेगूं नका.

५६२४

## ७ ईशस्तुति

(८७) पूजेचीं साधनें ईश्वरस्वरूप असल्यामुळें तुझी पूजा कशानें करूं? सर्वांबद्दल तुझें नामच घेतों.

कासियानें पूजा करूं केशीराजा। हा चि संदेह माझा फेडा आतां
उदकें न्हाणूं तरी स्वरूप चि तुझें। तेथें काय माझें वेचे देवा॥
गंधाचा सुगंध पुष्पाचा परिमळ। तेथें मी दुर्बळ काय वाहूं॥
वाहूं दक्षिणा तरि धातु नारायण। ब्रह्म तें चि अन्न दुजें काई॥
गातां तूं ओंकार टाळी नादेश्वर। नाचावया थार नाहीं कोठें॥
फळदाता तूंच तांबुल अक्षता। तरी काय आतां वाहों तुज॥
तुका म्हणे मज अवघें तुझें नाम। धूप दीप रामकृष्ण हरि॥

तुझी पूजा आतां कोणत्या साहित्यानें करूं ही माझी शंका तूं दूर कर. पाण्यानें स्नान घालावें तर पाणी हें तुझेंच स्वरूप आहे. स्नानाकरितां मी माझें कांहीं खर्च केलें असें होणार नाहीं. मी गंध किंवा पुष्प वाहावें तर त्यांचाही सुगंध तुझाच आहे. तेव्हां माझें कांहींच नसल्यावर मी तुला काय वाहावें! तुझ्यापुढें दक्षिणा ठेवूं तर धातु नारायणच आहे. व कांहीं नैवेद्य दाखवूं तर अन्न म्हणजे परब्रह्म आहे. तुझें नांव घेऊं लागलों तर ओंकार हें तुझेंच स्वरूप होय व टाळ वाजवूं लागलों तर तिचा नाद हा ईश्वरच होय. भजनाकरितां नाचण्याचें मनांत आणलें तर सर्व पृथ्वी तुझेंच रूप असल्यामुळें पाऊल टाकण्यास माझी अशी जागाच राहात नाहीं. तुझ्यापुढें फळ ठेवावें तर फळ देणारा तूंच. व विडा व अक्षता तूंच. तर मी तुला काय वाहूं व देऊं! देवा, धूप, दीप, नैवेद्य, यां सर्वांबद्दल राम-

कृष्णहरी हें नांवच घेणें योग्य. (तें मात्र आम्हीं भक्तांनीं तुला ठेवलेलें.
—अभंग चर्चा.)

---

(८८) सर्व सृष्टजात तुझें असल्यामुळें तुला अर्पण करावयास माझें असें कांहीं नाहीं, म्हणून तूं दिलेलें शरीरच तुझ्या चरणीं ठेवितों.

**वर्णूं महिमा ऐसी नाहीं मज वाचा। न बोलवे साचा पार तुझा॥**
**ठायींची हे काया ठेविली चरणीं। आतां ओंवाळुनि काय सांडूं॥**
**नाहीं भाव ऐसा करूं तुझी सेवा। जीव वाहूं देवा तो ही तुझा॥**
**मज माझें कांहीं न दिसे पाहातां। जें तुज अनंता समर्पावें॥**
**तुका म्हणे आतां नाहीं मज थार। तुझे उपकार फेडावया॥**

ठायींची—मूळ ठिकाणची. थार—आधार.

तुझा महिमा वर्णन करण्यास समर्थ अशी वाणी मला नाहीं, तुझें खरें व पूर्ण रूप आणि थोरवी सांगतां येत नाहीं, म्हणून मी आपला देह तुझ्या चरणावर—त्याच्या मूळच्या ठिकाणीं—ठेविला. आतां तुझ्या थोरवीचें कौतुक करण्याकरितां आणखी काय ओंवाळून टाकूं? तुझी सेवा करण्यास योग्य असा भाव मजजवळ नाहीं व जीव तुला दिला तरी तो तुझाच आहे. कितीही विचार केला तरी तुला अर्पण करण्यास माझें असें मला कांहीं सांपडत नाहीं. तुझे उपकार फेडण्यास माझ्या मालकीचा कोणताही आधार मजजवळ नाहीं.

---

(८९) तुमचें वर्णन अयोग्य झालें तरी तुम्ही राग करूं नये. कारण तुमचा पार मला समजणार नाहीं.

**कृपावंता कोप न धरावा चित्तीं। छळूं वक्रोक्ती स्तुती करूं॥**
**आम्ही तुझा पार काय जाणों देवा। नेणों कैसी सेवा करावी ते॥**
**अनंता अरूपा अलक्षा अच्युता। निर्गुणा सच्चिता सर्वोत्तमा॥**

**चांगलीं हीं नामें घेतलीं ठेवून । जालासी लाहान भक्तिकाजा ॥**
**तुका म्हणे तुझ्या पायांवरी सदा । मस्तक गोविंदा असो माझा ॥**

वक्रोक्ती—वेडेवाकडे बोलणें.

तूं कृपावंत असल्यामुळें आमच्यावर राग धरूं नकोस. आम्ही वेडेवांकडें बोलून तुला त्रास देऊं किंवा तुझी स्तुति करूं. तुझें खरें स्वरूप व सामर्थ्य आम्हांस कितीसें समजणार व तुझी सेवा कोणत्या स्वरूपांत करावी हें तरी कितीसें समजणार ! अनंत, अरूप, अलक्ष, अच्युत, निर्गुण, सच्चिदानंद, सर्वोत्तम असें तुझें वर्णन आहे. हे सर्व गुण टाकून देऊन तूं केवळ भक्तीच्या कार्याकरितां सगुण रूपाचा लहानपणा धरतोस. त्या सगुण पायांवर माझें डोकें नेहमीं असूं दे.

---

( ९० ) सोयरा, जीवलग, मित्र या सर्वांसारखी तुझी माझ्याशीं वागणूक आहे, म्हणून तुझाच अभ्यास मला सदा आवडतो.

**तूं आम्हां सोयरा सज्जन सांगाति । तुज मज प्रीति चालों सदा ॥**
**तूं माझा जिव्हाळा जीवाचा जिवलग । होसी अंतरंग अंतरींचा ॥**
**गण गोत मित्र तूं माझें जीवन । अनन्यशरण तुझ्या पायीं ॥**
**तुका म्हणे सर्व गुणें तुझा दास । आवडे अभ्यास सदा तुझा ॥**

सांगाती—सोबती.

देवा, तूंच आमचा नातलग व सोबत करणारा उत्तम मित्र आहेस. तुझें व माझें ( परस्परावरचें ) प्रेम नेहमीं असेंच राहूं दे. तूं माझ्या जिवाचा जिव्हाळ्याचा आधार आहेस व जिवाचा जिवलग मित्र आहेस. माझ्या अंतःकरणाचें अंतरंग तूंच आहेस. माझ्या नात्यांतील सर्वांच्या ठिकाणीं तूंच आहेस. मित्रांच्या ठिकाणीं तूंच आहेस व माझ्या जीवनाचा आधार तूंच असल्यामुळें मी तुझ्यापायीं एकनिष्ठपणें शरण आलों आहें. मी सर्व प्रकारें तुझा दास झालों आहें व तुझाच ध्यास मला आवडतो.

---

(९१) आईपेक्षांही देवाची करुणा अधिक योग्यतेची आहे.

माउलींसी सांगे कोण । प्रेम वाढवी तान्हें ॥
अंतरींचा कळवळा । करीतसे प्रतिपाळा ॥
मायबापाची उपमा । तुज देऊं मेघश्यामा ॥
तेही साजेना पाहातां । जीवलगा पंढरिनाथा ॥
माय पाळी संसारीं । परलोकीं राहे दुरी ॥
तैसा नव्हेसी अनंता । काळावरी तुझी सत्ता ॥
तुका म्हणे नारायणा । तुम्हां बहुत करुणा ॥

कोणत्या तान्ह्या मुलास 'प्रेम वाढव' असें आईला सांगावें लागते ? तिच्या अंतःकरणांतील कळवळाच मुलाचें रक्षण करण्याची प्रेरणा करतो. त्याप्रमाणेंच तुमच्या अंतःकरणांत आमच्याबद्दल कळवळा असल्यामुळें तुम्ही आमचें रक्षण करतां, म्हणून तुम्हांला मायबापाची उपमा आम्ही देतों; परंतु विचार केला असतां, त्या उपमेनें तुमच्या कळवळ्याची योग्यता पुरी वर्णितां येत नाहीं. कारण आई मुलाचें संरक्षण या लोकापुरतें करते. तिचें प्रेम परलोकीं येत नाहीं. देवा, तुझें प्रेम माझ्या मृत्युबरोबर थांबणारें नाहीं. कारण तुझी मृत्युवरही सत्ता आहे. तुमची करुणा आईपेक्षां अधिक आहे.

---

(९२) मी जें कांहीं करतों त्यास तुझी मदत आहे, ही खातरी झाल्यामुळें मला सुख होत आहे. मी आतां जगांत मजेनें राहातों.

जेथे जातों तेथें तूं माझा सांगाती । चालविसी हातीं धरूनियां ॥
चालों वाटे आम्ही तुझा चि आधार । चालविसी भार सवें माझा ॥
बोलों जातां बरळ करिसी तें नीट । नेली लाज धीट केलों देवा ॥
अवघें जन मज झाले लोकपाळ । सोइरे सकळ प्राणसखे ॥
तुका म्हणे आतां खेळतों कौतुकें । जालें तुझें सुख अंतर्बाहीं ॥

लोकपाळ—राजा, रक्षक.

मी जेथें जेथें जातों (जें जें मनांत आणतों व करतों) तेथें तेथें तूं बरोबर राहातोस व मला हातीं धरून मार्ग दाखवितोस. जगांतील वाटेनें मीच चालत आहें असें वाटतें, परंतु तुझ्याच आधारानें मी चालतों. माझ्यावरच्या ओझ्याचा स्वीकार तूं करतोस. मी स्वभावतः मनास येईल तसें बोलतों, पण तूं तें नीट करून घेतोस, त्यामुळें लोकलाज नाहींशी होऊन मी आतां धीट झालों आहे. सर्व लोक मला आतां ईश्वरासारखे रक्षक झाले आहेत. ते आतां मला अगदीं जवळच्या नात्याचे व प्राणाचे आवडते झाले आहेत. तुझें सुख अंतर्बाह्य अनुभवास येत असल्यामुळें आतां या जगांत मी लीलेनें वावरत आहे.

---

(९३) माझें मन व माझीं इंद्रियें स्थिर झालीं व मी त्रिगुणांच्या पलीकडे गेलों, हें माझें बळ नाहीं.

**तुझे पाय माझे राहियेले चित्तीं। तें मज दाविती वर्म देवा ॥**
**आम्हां अंधां तुझ्या पायांचा आधार। जाणसी विचार चालविता॥**
**मन स्थिर ठेलें इंद्रियें निश्चळ। हें तों माझें बळ नव्हे देवा॥**
**पापपुण्य भेद नासिलें तिमिर। त्रिगुण शरीर सांडियेलें ॥**
**तुका म्हणे तुझा प्रताप हा खरा। मी जाणें दातारा शरणागत ॥**

ठेलें—राहिलें. तिमिर—अंधकार.

तुझे पाय माझ्या अंतःकरणांत राहिले. तेच मला (जगाचें, तुझें, व तुला साधण्याचें) खरें वर्म समजावून देत असावे. आम्ही या बाबतींत आंधळे असल्यामुळें (आम्हांला धर्माचें वर्म समजण्यासारखें नसल्यामुळें) आम्हांला तुझ्याच पायांचा आधार घेतला पाहिजे. आम्हांला कोणत्या रीतीनें चालविलें पाहिजे याचा विचार तूं जाणतोस. माझें चंचल मन आतां स्थिर झालें आहे व माझ्या इंद्रियांची विषयांकडील धांव खुंटली आहे. हें जें झालें तें केवळ माझ्या सामर्थ्यानें खास झालें नाहीं. पाप व पुण्य हा भेद आतां मला कळूं लागला. जें समजत नव्हतें (जेथें अंधकार वाटत होता) तें समजूं लागलें आहे. शरिरांतील सत्व, रज, तम, हे गुण

नाहींसे होऊन मी त्रिगुणातीत झालों आहें. हा सर्व परिणाम तुझ्या पराक्रमाचा आहे, हें मी जाणतों. तूं तसाच उदार आहेस. मी तुला शरण आहें, ( मी कांहीं तुझ्या मदतीशिवाय करतों असें मुळींच समजत नाहीं ) व तुझ्या मदतीची याचना करतों.

---

( ९४ ) देवाच्या कृपेनें आपल्या डोळ्यांस दैवी सामर्थ्य येऊन सृष्टीचें व देवाचें खरें स्वरूप आपणांस समजूं लागतें.

**जरि हा हो कृपा करिल नारायण । तरी हें चि ज्ञान ब्रह्म होय ॥**
**कोठोनियां कांहीं न लगे आणावें । न लगे कोठें जावें तरावया ॥**
**जरी देव कांहीं धरिल पैं चित्तीं । तरि हेचि होती दिव्य चक्षु ॥**
**तुका म्हणे देव दावील आपणा । तरी जीवपणा ठाव नाहीं ॥**

जर नारायणानें कृपा केली तर त्याची कृपा हेंच ज्ञान व हेंच ब्रह्म होईल. कृपेनें ब्रह्माचेंच ज्ञान होईल. ( किंवा—जें दिसत आहे तें ब्रह्मस्वरूप दिसावयास लागेल. ) तें ज्ञान दुसऱ्या ठिकाणाहून आणावें लागत नाहीं; किंवा त्याकरितां कोठें दूर जावें लागत नाहीं. जर देवाच्या मनास आलें तर आपले जड डोळ्यास दैवी सामर्थ्य येतें व जें जड डोळ्यांनीं दिसत नाहीं तें दिसूं लागतें. देवानें आपणाला जें एरवीं दिसत नाहीं तें दाखविलें तर आपला जीवपणा शिल्लक राहाणार नाहीं.

---

( ९५ ) तूं निर्मळ अंत:करणाच्या भक्तास त्याचें कूळ न पाहातां आपलें पद देतोस. असा उदार दुसरा कोण आहे ?

**तुज ऐसा कोण उदाराची रासी । आपुलेंचि देसी पद दासा ॥**
**शुद्ध हीन कांहीं न पाहासी कुळ । करिसी निर्मळ वास देहीं ॥**
**भावें हें कदान्न खासी त्याचे घरीं । अभक्तांच्या परी नावडती ॥**
**न वजासी जथें दुरी दवडितां । न येसी जो चित्ता योगियांच्या ॥**
**तुका म्हणे ऐसीं ब्रीदें तुझीं खरीं । बोलतील चारी वेद मुखें ॥**

आपलें स्वतःचें स्थान दासास देणारा असा तुझ्यासारखा उत्तम दाता कोण आहे ! दास शुद्ध कुळांतील का हीन कुळांतील ह्याची विचक्षणा तूं करीत नाहींस. तूं कोणत्याही कुळांतील निर्मळ देहांत वास करतोस. त्या निर्मळ देहाच्या भक्ताच्या घरीं तुला कमी प्रतीचें अन्न खाण्याची आवड वाटते, पण अभक्ताच्या घरीं सुग्रास अन्न खाणें तुला आवडत नाहीं. तुला ध्यानानें पहाणाऱ्या योग्यांच्या ध्यानांत तूं येत नाहींस, उलट निर्मळ भक्तांनीं घरांतून दूर दवडला तरी तूं घर सोडीत नाहींस. तुझी वागण्याची पद्धति खरोखर अशीच आहे असें चारही वेदांवरून दिसून येतें. ( वेदामध्येंसुद्धां तुझ्या ब्रीदाचें वर्णन असेंच केलेलें आहे.)

---

( ९६ ) मला तुझ्या आधाराशिवाय मोह दूर करतां आले नाहींत.

**जरी तुझा मज नसता आधार। कैसा हा संसार दुस्तावता ॥**
**ऐसा बळी कोण होईल पुरता। जो हे वारी चिंता आशापाश ॥**
**मायामोहफांसा लोकलाजबेडी। तुजविण तोडी कोण एक ॥**
**हें तों मज कळों आलें अनुभवें। बरें माझ्या जीवें पांडुरंगा ॥**
**तुका म्हणे यास तूंचि माझा ग्वाही। परी भाव नाहीं जन लोकां ॥**

जर मला तुझा आधार नसता तर संसारांतील मोह माझ्यानें कसे दूर करविले असते ! चिंता व आशा यांचें निवारण ( तुझ्या मदतीशिवाय ) करील इतका सामर्थ्यवान भक्त कोण आहे ! माया व मोह यांचे फास व लोकलज्जेची बेडी तुझ्याशिवाय कोणास तोडतां येणार आहे ? मला माझ्या अनुभवानें हें तुझें सामर्थ्य व माझें दौर्बल्य चांगलें समजलें, याला तूंच स्वतः साक्षी आहेस. सामान्य लोकांच्या ठिकाणीं जरूर तितका भाव नसतो. त्यांना हें ( तुझें सामर्थ्य ) खरें वाटत नाहीं.

---

( ९७ ) आमचीं कर्में दुस्तर, आमची भक्ति दंभाची, त्यामुळें तुला बोल लावतां येत नाहीं.

**बोल नाहीं तुझ्या दातृत्वपणासी। आम्ही अविश्वासी सर्वभावें॥**
**दंभें करी भक्ती सोंग दावी जनां। अंतरिं भावना वेगळिया॥**
**चित्ता तूं रे साक्षी तुज कळे सर्व। किती करूं गर्व आतां पुढें॥**
**तुका म्हणे देवा तूं काय करिसी। कर्मा दुस्तरासी आमुचिया॥**

देवा,तुझ्या उदारपणाच्या वृत्तीकडे कांहीं दोष येत नाहीं. आम्हीच अविश्वासानें वागणाऱ्या वृत्तीचे आहों. आमची भक्ति दांभिकपणाची आहे. आम्ही लोकांना भक्तीचें सोंग दाखवितों. आमच्या अंतःकरणांतील इच्छा वेगळ्याच असतात. आमच्या अंतःकरणांत काय चालतें यास तूं साक्षी असल्यामुळें तुजला सर्व खरें समजत आहे. ( मी लोकांपुढें कांहीं सोंग केलें तरी ) तुझ्या पुढें मला किती गर्व करतां येईल ! देवा, आम्हांला मागें खेचणाऱ्या आमच्या कर्मांमुळेंच तुझे श्रम फुकट जातात.

---

## ८ प्रार्थना

( ९८ ) देवा, माझा सर्वप्रकारचा आधार तूं आहेस. तुला मी आपला जीव अर्पण केला. माझ्या उध्दाराचा योग्य उपाय तूंच कर.

**तूं माझा मायबाप सकळ वित्त गोत। तूं चि माझें हित करितां देवा**
**तूं चि माझा देव तूं चि माझा जीव। तूं चि माझा भाव पांडुरंगा॥**
**तूं चि माझा आचार तूं चि माझा विचार। तूं चि सर्व भार चालविसी**
**सर्व भावें मज तूं होसी प्रमाण। ऐसी तुझी आण वाहातसें॥**
**तुका म्हणे तुज विकला जीवभाव। कळे तो उपाव करीं आतां॥**

देवा, मायबाप, धन, गोत या सर्वांच्या ठिकाणीं मला तूं आहेस. तूंच माझें हित पाहाणारा आहेस. तूं माझा देव आहेस, माझा जीव तूंच आहेस, व माझी सर्व श्रद्धा तुझ्याच ठिकाणीं आहे. आचार करावयाचा तो तुझ्याक-

रितां. विचार करावयाचा तो तुझ्याकरितां. तूं माझा सर्व भार घेणारा आहेस. सर्व प्रकारें तूं मला आधार आहेस, हें मी शपथपूर्वक सांगतों. देवा मी माझा जीव व भाव तुला देऊन टाकला आहे. आतां तुला जरुर दिसेल तो उपाय तूं कर.

---

( ९९ ) देवा, मायबापाप्रमाणें माझ्या वेड्यावाकड्या बोलानेंही तुला दया येऊं दे.

**प्रीतिचिया बोला नाहीं पेसपाड । भलतैसें गोड करूनि घेई ॥**
**तैसें विठ्ठलराया तुज मज आहे। आवडीनें गायें नाम तुझें ॥**
**वेडे वांकडे बाळकाचे बोल। करिती नवल मायबाप ॥**
**तुका म्हणे तुज येवो माझी दया। जीवांच्या सखया जिवलगा ॥**

पेसपाड—डावपेंच

बालकाचें बोलणें प्रीतीचें असतें. त्यांत बोलण्याचें कौशल्य नसतें. तें भलतें असलें तरी आपण गोड करुन घेतों. विठ्ठला, तुझा माझा संबंध त्याच प्रकारचा आहे. मी तुझें नाम आवडीनें गातों. ( तें योग्य रीतीनें गातों असें नाहीं. ) बालकाचे बोल वेडेवाकडे असतात पण त्याचें कौतुक आई-बाप करतातच. त्याचप्रमाणें देवा, मी तुझा जिवलग असल्यामुळें, तुला माझी दया येऊं दे.

---

( १०० ) तुझ्या बद्दल उत्पन्न झालेला भाव दुर्बुद्धि न येतां सिद्धीस जावो.

**दुर्बुद्धि ते मना । कदा नुपजो नारायणा ॥**
**आतां ऐसें करीं । तुझे पाय चित्तीं धरीं ॥**
**उपजला भावो । तुझे कृपें सिद्धी जावो ॥**
**तुका म्हणे आतां । लाभ नाहीं या परता ॥**

माझ्या मनांत वाईट विचार येऊं देऊं नको. मी तुझे पाय चित्तीं धरीन असें होऊं दे. हा भाव माझ्या मनास पटला आहे. तो तुझ्या कृपेनें सिद्धीस जाऊं दे. यापेक्षां अधिक लाभाची गोष्ट दिसत नाहीं.

---

( १०१ ) मी अपराधी पातकी आहें तरी त्याबद्दल आईप्रमाणें तूंच उपाय करून माझें पाळण कर.

**बाल मातेपाशीं सांगे तानभूक । उपायाचें दुःख काय जाणे ॥**
**तयापरी करीं पाळण हें माझें । घेउनियां ओझें सकळ भार ॥**
**कासया गुणदोष आणिसील मना । सर्व नारायणा अपराधी ॥**
**सेवाहीन दीन पातकांची रासी । आतां विचारिसी काय ऐसें ॥**
**जेणें काळें पायीं अनुसरलें चित्त । निर्धार हें हित जालें ऐसें ॥**
**तुका म्हणे तुम्ही तारिलें बहुतां । माझी कांहीं चिंता असो द्यावी ॥**

लहान मुलाला भूक किंवा तहान लागली कीं तें ती आईला सांगतें. भूक किंवा तहान कशी शमवावी यांचा उपाय करण्याचा दुःखदायक विचार व श्रम मुलास करावे लागत नाहींत. त्याप्रमाणेंच देवा, तूं माझ्याबद्दल सर्व प्रकारचा भार स्वीकारून आईप्रमाणें माझें रक्षण कर. नारायणा, माझ्यामध्यें असलेले दोष आतां मनावर घेऊं नकोस. मी सर्व तऱ्हेनें अपराधी आहें. मी सेवाहीन आहें, गुणी नाहीं, मीं अनेक पातकें केलेलीं आहेत, असा विचार तूं आतां करूं नकोस. ज्या वेळेस मी आपलें मन तुझ्याकडे लावलें, त्या वेळेस त्याचें हित तूंच करणारा आहेस या खातरीनेंच लावलें आहे. तूं अनेकांना तारलें आहेस, माझी काळजी थोडीशीच पडेल ती आतां तूं घे.

---

( १०२ ) माझी बुद्धि सारखी पालटते, तरी तूंच आतां हृदयांत येऊन तिला निश्चल कर.

**मी अवगुणी अन्यायी । किती म्हणोन सांगों काई ॥**
**आतां मज पायीं । ठाव देईं विठ्ठले ॥**

नं. ३७५ नं. ५६१ ता. ४।२ ड्रा. गो.

पुरे पुरे हा संसार। कर्म बळिवंत दुस्तर॥
राहों नेदी स्थिर। एके ठायीं निश्चळें॥
अनंत बुद्धीचे तरंग। क्षणक्षणां पालटती रंग॥
धरूं जातां संग। तंव तो होतो बाधक॥
तुका म्हणे आतां। अवघी तोडी माझी चिंता॥
येऊनी पंढरीनाथा। वास करीं हृदयीं॥

मी किती तरी दुर्गुणी व अन्यायानें वागणारा आहे! म्हणून आतां मला तुझ्या पायाजवळच ठेवून घे. या संसारांत कर्म फार बळानें खेचीत असल्यामुळें बुद्धीला स्थिरता नाहीं. ती क्षणक्षणा पालटत असते. आणि कोणाचा संग धरला तरी तो बाधकच होतो. देवा, आतां माझ्या हृदयांत येऊन रहा व मला निष्काळजी कर.

---

( १०३ ) मी क्रियामतिहीन असलों तरी माझ्या गुणदोषाकडे लक्ष न देतां, माझे अनंत अपराध पोटांत घाला.

क्रियामतिहीन। एक मी गा तुझें दीन॥
देवा करावा सांभाळ। वारीं माझी तळमळ॥
नको माझे ठायीं। गुणदोष घालूं कांहीं॥
अपराधाच्या कोटी। तुका म्हणे घाला पोटीं॥

माझ्या अंगीं कर्तृत्व नाहीं व माझी मति अशुद्ध असून मी दीन आहें. पण मी तुमचा आहें. तरी देवा, माझा सांभाळ करून माझी तळमळ नाहींशी करा, माझ्यामध्यें अमुक गुण नाहींत, अमुक दोष आहेत, असें सांगून माझा सांभाळ करण्याचें नाकारूं नका. मी कोटी अपराध केले असले तरी ते पोटांत घाला.

---

( १०४ ) देवा, मी अनेक पातकें करणारा असलों तरी माझा अंगीकार करा.

**अवघ्या पातकांची मी एक रासी। अवघा तूं चि होसी सर्वोत्तम॥**
**जैसा तैसा लागे करणें अंगीकार। माझा सर्व भार चालविणें॥**
**अवघेंचि मज गिळियेलें काळें। अवघीं च बळें तुझे अंगीं॥**
**तुका म्हणे आतां खुंटला उपाय। अवघेचि पाय तुझे मज॥**

मी अनेक पातकांची रास आहे; परंतु तुम्ही सर्वांत उत्तम आहांत. म्हणून मी पातकी असलों तरी, माझा अंगीकार तुम्हीं केलाच पाहिजे. माझ्याकरितां जें काय तुम्हास करावें लागेल, तें केलें पाहिजे. काळानें मला पुरतें गिळलें आहे, तरीही त्याच्या तडाक्यांतून मला वाचविण्यास पुरेशी शक्ति तुमच्या आंगीं आहे. माझी सुटका करण्याचे माझे उपाय निरुपयोगी आहेत. माझे सर्व योग्य उपाय म्हणजे तुमचे पायच होत.

---

( १०५ ) बाहेरचा वेष साधला तरी, तुझ्या मदतीशिवाय आचरण साधणार नाहीं. तूं साह्य कर.

**तुज पाहावें हे धरितों वासना। परि आचरणा नाहीं ठाव॥**
**करिसी कैवार आपुलिया सत्ता। तरि च देखता होइन पाय॥**
**वाहिरल्या वेषें उत्तम दंडलें। भीतरी मुंडलें नाहीं तैसें॥**
**तुका म्हणे वांयां गेलों च मी आहे। जरी तुम्हीं साहे न व्हा देवा॥**

तुझें दर्शन व्हावें अशी इच्छा करतों. परंतु तें होण्यास योग्य असें आचरण घडून येत नाहीं. तूं आपल्या सामर्थ्यानें कांहीं युक्ति केलीस तरच तुझें दर्शन मला होईल. मला बाहेरचा वेष उत्तम साधला आहे. परंतु माझें अंतःकरण तसें उत्तम शुद्ध नाहीं. देवा, तुम्हीं मला मदत केली नाहीं, तर मी फुकट गेलों आहें तसाच राहीन.

---

( १०६ ) मीं दाखवितों: तशी वृत्ति अंतःकरणांत नाहीं. मला पतिताला तूंच पावन कर.

**गातों भाव नाहीं अंगीं। भूषण करावया जगीं॥**
**परी तूं पतितपावन। करीं साच हें वचन॥**

**मुखें म्हणवितों दास । चित्तीं माया लोभ आस ॥**
**तुका म्हणे दावीं वेश । तैसा अंतरीं नाहीं लेश ॥**

मी तुझे गुण गाण्याचें काम करतों. परंतु तें जगांत भूषण मिळविण्याकरितां करतों, त्यांत भाव नाहीं. मला पतिताला पावन करून तुझें पतितपावन हें नांव खरें कर. मी तोंडानें तुझा दास म्हणवितों. परंतु मनांत माया, लोभ, आशा हीं आहेत. मी दासाचा (भक्ताचा) वेश घेतला आहे. परंतु वेशास योग्य असा लेशही माझ्या अंतःकरणांत नाहीं.

---

(१०७) ज्यांच्या चित्तीं देव आहे अशांची संगती मला दे.

**देव वसे चित्तीं । त्याची घडावी संगती ॥**
**ऐसें आवडतें मना । देवा पुरवावी वासना ॥**
**हरिजनासी भेटी । नहो अंगसगें तुटी ॥**
**तुका म्हणे जिणें । भलें संतसंघष्टणें ॥**

ज्याच्या मनाला देवाचा ध्यास आहे अशाची संगती घडावी असें माझ्या मनाला आवडतें. ही माझ्या मनाची इच्छा, देवा, तुम्ही पूर्ण करा. हरीचे सेवेंत गुंतलेल्या संतांची भेट होऊन त्यांच्या संगतींत खंड येऊं नये. संतांच्या सहवासानें आपला मनुष्यजन्म सत्कारणीं लागतो. (त्याचें सार्थक होतें.)

---

(१०८) देवा, पापाची वासना, निंदेचें श्रवण, अपवित्र वाणी, परस्त्रीसंगति हीं नकोत.

**पापाची वासना नको दावूं डोळां । त्याहूनि अंधळा बराच मी ॥**
**निंदेचें श्रवण नको माझे कानीं । बधिर करोनी ठेवीं देवा ॥**
**अपवित्र वाणी नको माझ्या मुखा । त्याजहुनि मुका बराच मी ॥**
**नको मज कधीं परस्त्रीसंगती । जनांतुन माती उठतां भली ॥**
**तुका म्हणे मज अवघ्याचा कांटाळा । तूं एक गोपाळा आवडसी ॥**

माझ्या दृष्टीपुढें पापाची इच्छा येऊं देऊं नको. त्यापेक्षां मला अंधळा कर. माझ्या कानानें निंदेच्या गोष्टी ऐकावयास लावूं नको. त्यापेक्षां मला बहिरा कर. माझ्या तोंडांत वाईट शब्द नकोत. त्यापेक्षां मला मुका कर. परस्त्रीची संगति घडूं देऊं नको. त्यापेक्षां माझें आयुष्य संपलेलें पुरवलें. या सर्व वाईट उद्योगांचा मला कंटाळा आला आहे. आतां मला फक्त तुझीच आवड प्रिय आहे.

---

( १०९ ) नरस्तुति, परनारी, परधन भूतांचा मत्सर, संतनिंदा, देहाभिमान यांकडे माझें मन वळूं देऊं नका.

**नरस्तुति आणि कथेचा विकरा । हें नको दातारा घडों देऊं ॥**
**येसिये कृपेची भाकितों करुणा । आहेसि तूं राणा उदाराचा ॥**
**पराविया नारी आणि परधना । नको देऊं मनावरी येऊं ॥**
**भूतांचा मत्सर आणि संतनिंदा । हें नको गोविंदा घडों देऊं ॥**
**तुका म्हणे तुझ्या पायांचा विसर । नको वारंवार पडों देऊं ॥**

देवा, माझ्या तोंडानें मनुष्याची स्तुति होऊं देऊं नको; किंवा उपदेश देऊन पैसा मिळविण्याचें काम होऊं देऊं नको. तूं उदारांचा राणा असल्यामुळें ही कृपा सहज करशील, म्हणून तुजजवळ करुणा भाकतों. परस्त्री व परधन यांच्याकडे माझें लक्ष जाऊं देऊं नको. प्राण्याला दुःख देण्याचें वर्तन व चांगल्या मनुष्याची निंदा माझ्याकडून होऊं देऊं नको. देवा, तुझ्या पायांचा वारंवार विसर पडतो; तसें होऊं देऊं नको.

---

( ११० ) देवा, माझें मन अनावर होऊन मी इंद्रियांच्या आधीन झालों आहें. त्यांच्यापासून तूं मला सोडीव.

**माझे मज कळों येती अवगुण । काय करूं मन अनावर ॥**
**आतां आड उभा राहें नारायणा । दयासिंधुपणा साच करीं ॥**
**वाचा वदे परी करणें कठीण । इंद्रियां अधीन जालों देवा ॥**
**तुका म्हणे तुझा जैसा तैसा दास । न धरीं उदास मायबापा ॥**

माझे दोष मला समजतात. ते काढून टाकावे पण मन आवरत नाहीं. त्याला आतां काय करावें ? देवा, तूं मला आतां पाठीशीं घाल; आणि तुझ्या दया करण्याच्या गुणाचा मला अनुभव येऊं दे. मी वाणीनें चांगलें आचरण करण्याचें बोलतों पण तसें वागणें माझ्यानें होत नाहीं. कारण मी इंद्रियांच्या स्वाधीन झालों आहें. देवा, मी असा असलों तरी तुझा भक्त आहें. आतां माझी उपेक्षा करूं नको किंवा माझ्याबद्दल उदासीन राहूं नको.

---

( १११ ) मी अधर्म करून स्वतःचा घात केला आहे. आतां तूं मला तार.

**मी तंव अनाथ अपराधी । कर्महीन मतिमंदबुद्धि ॥**
**तुज म्यां आठविलें नाहीं कधीं । वाचे कृपानिधि मायबापा ॥**
**नाहीं ऐकिलें गाइलें गीत । धरिली लाज सांडिलें हित ॥**
**नावडे पुराण बैसले संत । केली बहुत परनिंदा ॥**
**केला करविला नाहीं परउपकार । नाहीं दया आली पीडितां पर ॥**
**करूं नये तो केला व्यापार । वाहिला भार कुटुंबाचा ॥**
**नाहीं केलें तीर्थांचें भ्रमण । पाळिला पिंड करचरण ॥**
**नाहीं संतसेवा घडलें दान । पूजावलोकन मुर्तीचें ॥**
**असंगसंग घडले अन्याय । बहुत अधर्म उपाय ॥**
**न कळे हित करावें तें काय । न ये बोलूं आठवूं तें ॥**
**आप आपणिया घातकर । शत्रू जालों मी दावेदार ॥**
**तूं तंव कृपेचा सागर । उतरीं पार तुका म्हणे ॥**

हे मायबापा, कृपासागरा, मी निराधार व अपराधी मनुष्य आहें. माझ्या हांतून कोणतेंही चांगलें कर्म घडलेलें नाहीं. मी बुद्धीनें मंद असून तुझें स्मरण केलेलें नाहीं. मी तुझें कीर्तन ऐकण्यास बसलों नाहा, किंवा तें स्वतः केलें नाहीं. तसें करण्यास मला लाज वाटली आणि मी आपले हितास मुकलों. हितकारक गोष्टी करण्याचें मला कळलें नाहीं. हिताचें

बोलणें व हिताची आठवण मला कधींच झाली नाहीं. मला पुराणांतील गोष्टी किंवा संतांचे समुदाय आवडले नाहींत. मी दुसऱ्याची निंदा करण्याचें काम केलें. मी स्वतः परोपकार केला नाहीं, किंवा दुसऱ्याकडून करविला नाहीं. दुसऱ्यांना त्रास देतांना मला दया आली नाहीं. जीं कृत्यें करूं नयेंत, तीं मीं केलीं. आणि कुटुंबाचें पोषण करण्यांत फक्त गुंतून राहिलों. मी तीर्थयात्रा केल्या नाहींत. आपला पिंड फक्त सांभाळला. संतसेवा केली नाहीं, दान दिलें नाहीं, देवाच्या मूर्तीचें पूजन किंवा दर्शन केलें नाहीं. वाइटांच्या नादीं लागून माझ्याकडून वाईट कृत्यें झालीं. मी स्वतःचा शत्रू होऊन स्वतःची हत्या केली. परंतु तूं कृपासागर आहेस. तूं मला यांतून पलीकडे ने.

---

(११२) मी मनाला आळवितों तरी तें विषयांकडे धावतें. देवा, आतां तूंच तें आवर.

**काय करूं आतां या मना । न संडी विषय वासना ॥**
**प्रार्थितां ही राहेना । आदरें पतना नेऊं पाहे ॥**
**आतां धावें धावें गा श्रीहरी । गेलों वांयां नाहीं तरी ॥**
**न दिसे कोणी आवरी । आणीक दुजा तयासी ॥**
**न राहे एके ठायीं एकी घडी । चित्त तडतडा तोडी ॥**
**भरलें विषय ओवडी । घालूं पाहे उडी भव डोहीं ॥**
**आशा तृष्णा कल्पना पापिणी । घात मांडला माझा यांणीं ॥**
**तुका म्हणे चक्रपाणी । काय आजोनि पाहातोसी ॥**

या मनाला कोणत्या रीतीनें ताब्यांत आणूं ? विषयांची इच्छा तें मुळींच सोडीत नाहीं. त्याची प्रार्थना केली तरी तें राहात नाहीं. व त्याला कितीही मोठेपणा दिला तरी तें मला अधोगतीस नेण्यास पाहातें. देवा, आतां तूंच धावून ये. नाहींतर माझें आयुष्य फुकट जाणार आहे. तुझ्याशिवाय याला आवरणारा दुसरा कोणी दिसत नाहीं. हें मन एक घडीभरही एका विचारांत राहात नाहीं; व तें चित्तास अनेक विषयांकडे नेण्याकरितां विचारांतून उठवतें. मन विषयांच्या आवडीनें भरलें असल्यामुळें तें मला

संसाराच्या पाशांत अडकवूं पाहात आहे. आशा, हाव, मिथ्या विचार, या पापिणींनीं माझा घात करावयाचा पुरा बेत केला आहे. देवा, तुझ्याजवळ सुदर्शनचक्र असून तूं अजून माझी ही दशा नुसती पाहात काय बसलास!

---

( ११३ ) माझें मन क्षणभर सुद्धां आवरत नाहीं. इंद्रियांनीं ओढलें जातें. देवा, आतां धाव आणि त्यास निश्चल कर.

**मन माझें चपळ न राहे निश्चळ । घडी एकी पळ स्थिर नाहीं ॥**
**आतां तूं उदास नव्हें नारायणा । धांवें मज दीना गांजियेलें ॥**
**धांव घालीं पुढें इंद्रियांचे ओढी । केलें तडातोडी चित्त माझें ॥**
**तुका म्हणे माझा न चले सायास।राहिलों हें आस धरुनी तुझी॥**

माझें मन फार चंचल आहे. तें निश्चळ राहात नाहीं. त्याला एक पळ देखील स्थिर करतां येत नाहीं. देवा, तूं आतां मजकडे दुर्लक्ष करूं नको. तूं आधीं धाव, मज गरिबाला याचा फार त्रास होत आहे. माझें मन इंद्रियांच्या ओढीनें इंद्रियांच्या विषयांच्या मागें लागतें; आणि त्यास चोहोंकडून ओढ लागते. ही ओढ बंद करण्यास माझ्या प्रयत्नांचा उपयोग होत नाहीं, म्हणून तूं मला मदत करण्यास येत आहेस अशी खातरी मी बाळगून आहें.

---

( ११४ ) मनाचें नियमन करावयास लागलों तर तें अधिकच विषयांकडे धावतें व सर्व वेळ त्रास देतें. देवा, तूंच आतां त्यास राख.

**अधिक कोंडितां चरफडी । भलतीकडे घाली उडी ॥**
**काय करूं या मना आतां । कां विसरतें पंढरिनाथा ॥**
**करी संसाराची चिंता । वेळोवेळां मागुती ॥**
**भजन नावडे श्रवण । धांवे विषय अवलोकून ॥**
**बहुत चंचल चपळ । जातां येतां न लगे वेळ ॥**
**किती राखों दोनी काळ । निजलिया जागे वेळ ॥**
**मज राखें आतां । तुका म्हणे पंढरिनाथा ॥**

मी मनाला अधिक ताब्यांत ठेवूं लागलों तर तें अधिकच भलत्या बाबीकडे धांव घेऊं लागतें. आतां या मनाला काय करावें ! तें पंढरिनाथास कां विसरतें ? या मनाला संसाराबद्दल पुनः पुनः काळजी वाटते. त्यास ईश्वराचें भजन व ईश्वराचें कीर्तन हीं आवडत नाहींत. त्याला विषय दिसले कीं त्यांकडे धावावेंसें वाटतें. तें इतकें चंचल व चपळ आहे कीं, विषयांकडे जाण्यास व येण्यास त्यास वेळच लागत नाहीं. त्याला जागें असतांना एवढेंच नव्हें तर निजल्यावरही किती जपावें ? पंढरिनाथा, तूंच मला या मनाच्या ताब्यांतून सोडीव.

---

( ११५ ) तूं अनेक भक्तांचीं बंधनें तोडलीं आहेस. तुझें गुह्य गुज मला कळूं देऊन शांति दे.

**अनंत जीवांचीं तोडिलीं बंधनें । मज येणें काळे कृपा कीजे ॥**
**अनंत पवाडे तुझे विश्वंभरा । भक्तकरुणाकरा नारायणा ॥**
**अंतरींचें कळों देईं गुह्य गुज । अंतरीं तें बीज राखईन ॥**
**समदृष्टी तुझीं पाहेन पाउलें । धरीन संचलें हृदयांत ॥**
**तेणें या चित्ताची राहील तळमळ । होतील शीतळ सकळ गात्रें ॥**
**तुका म्हणे शांति करील प्रवेश । मग नव्हे नाश अखंड तो ॥**

नारायणा, तूं कितीतरी प्राण्यांना जगांतील बंधनांतून सोडविलें आहेस. आतां आज माझ्यावर कृपा कर. नारायणा, तूं विश्वाचें रक्षण करणारा व भक्तांची करुणा करणारा आहेस. तुझी स्तुति करण्यायोग्य कृत्यें अनंत आहेत. तरीं तुला मिळविण्याची अप्रगट युक्ति तूं मला उघड कर. तें मूळ बीज मी आपल्या अंतःकरणांत लावून वाढवीन. तुझीं पावलें सर्वांस सारखीं लेखणारीं सरळ आहेत हें मला दिसेल. व अंतःकरणांत जी स्फूर्ति होईल ती कायम राहील. माझ्या मनाला जी तळमळ लागली आहे ती त्या स्फूर्तीमुळें थांबेल. व माझी सर्व इंद्रियें वासनारहित होतील. इंद्रियांतील वासना गेल्यामुळें तेथें शांति दिसेल. व त्यामुळें माझ्या जीवनाचा नाश होण्याचा संभव कल्पांतींही येणार नाहीं.

---

( ११६ ) मी पातकी असलों तरी तूं आईप्रमाणें आघात चुकवून मला सुख दे.

**एकांताचें सुख देई मज देवा । आघात या जीवा चुकवूनि ॥**
**ध्यानीं रूप वाचे नाम निरंतर । आपुला विसर पडों नेदीं ॥**
**मायबाळा भेटी सुखाची आवडी । तैशी मज गोडी देई देवा ॥**
**कीर्ती ऐकोनिया जालों शरणांगत । दासाचें तूं हित करितोसी ॥**
**तुका म्हणे मी तो दीन पापराशी । घालावें पाठीशीं मायबापा ॥**

माझ्या जिवाचें वाईट होऊं देऊं नका. आणि मला तुमच्याशीं एकरूप होण्याचें सुख अनुभवूं द्या. वाचेनें नाम येऊं द्या व ध्यानानें तुम्हांस पाहूं द्या. अशा रीतीनें तुमचा विसर पडूं देऊं नका. आई आणि मूल यांच्या भेटींत परस्परास भेटण्याच्या सुखाची आवड वाटते. त्या सुखाची गोडी मला अनुभवायास मिळूं द्या. आपल्या दासाच्या हिताच्या गोष्टी तुम्ही करितां, अशी कीर्ती ऐकून मी तुम्हांला शरण आलों आहें. मी अनेक पापें केलीं असलीं व योग्यतेनें कमी असलों तरी आपण मायबाप आहां. मला पाठीशीं घालून माझें रक्षण करा.

---

( ११७ ) पाण्याकरितां मासा, भूमिगत धनाकारितां मन, आई-करितां बाळ, त्याप्रमाणेंच माझा जीव तुझ्याकरितां तळमळत आहे. माझ्यावर कृपा कर.

**जीवनावाचूनि तळमळी मासा । प्रकार हा तैसा होतो जीवा ॥**
**न संपडे जालें भूमिगत धन । चरफडी मन तयापरी ॥**
**मातेचा वियोग जालिया हो बाळा । हा तो कळवळा जाणा देवा ॥**
**सांगावे ते किती तुम्हांसी प्रकार । सकळांचें सार पाय दावीं ॥**
**येचि चिंते माझा करपला भीतर । कां नेणों विसर पडिला माझा ॥**
**तुका म्हणे तूं हें जाणसी सकळ । यावरी कृपाळ होईं देवा ॥**

**भीतर**—अंतःकरण.

पाण्यावाचून माशाची जशी तळमळ होते त्याचप्रमाणें माझ्या जीवाची स्थिति होते. जमिनींत पुरून ठेवलेलें धन सांपडलें नाहीं म्हणजे मन जसें चरफडतें, तसेंच माझें मन चरफडत आहे. बाळाला मातेचा वियोग झाल्यावर त्याची जी उलघाल होत असेल ती, देवा, लक्षांत आणा. आणखी किती उदाहरणें देऊन माझी स्थिति सांगूं ! इतकीं उदाहरणें देण्याचें सार हें कीं, तुमची भेट मला होऊं द्या. माझा विसर पडला कीं काय या चिंतेनें माझें अंतःकरण करपलें आहे. माझ्या अंतःकरणाची स्थिति तुम्हांला कळत असल्यामुळें आतां तुम्ही कृपाळू व्हा. (आणि माझ्यावर कृपा करा.)

---

## ९ अनुभवाचे उद्गार.

### आत्मपरीक्षण

( ११८ ) मनापासून प्रपंचाचा त्याग केला नसल्यामुळें चित्त प्रपंचाबाहेर येत नाहीं.

**बळें बाह्यात्कारें संपादिलें सोंग । नाहीं जाला त्याग अंतरींचा ॥**
**ऐसें येतें नित्य माझ्या अनुभवा । मनासी हा ठावा समाचार ॥**
**जागृतीचा नाहीं अनुभव स्वप्नीं । जातों विसरुनि सकळ हें ॥**
**प्रपंचाबाहेरि नाहीं आलें चित्त । केले करी नित्य वेवसाय ॥**
**तुका म्हणे मज भोरप्याचि परी । जालें सोंग वरी आंत तैसें ॥**

**समाचार**—हकीकत. **भोरपी**—बहुरूपी.

बाहेरून मोठ्या प्रयत्नानें भक्तीच्या सोंगाची बतावणी करतों पण अंतःकरणापासून जगांतील व्यवसायांचा त्याग होत नाहीं, असा मला नेहमीं अनुभव येतो. माझ्या मनाला हा सर्व प्रकार चांगला समजतो. खऱ्या जागृतीचा अनुभव स्वप्नांतसुद्धां येत नाहीं. खऱ्या त्यागाचा विचार अजिबात विसरून जातो. रोजच्या व्यवसायांतून चित्त निघत नाहीं. म्हणून केलेले व्यवहार पुनः करावे असें त्यास वाटतें. माझी स्थिति बहुरुप्या-

स. ..... नं. .....
ठाणे.

सारखी होते. बहुरुप्याचें सोंग वरवरचें असतें. माझें चित्त बहुरुप्याप्रमाणेंच बाह्यसोंग घेतें. तें आंत जसेंच्या तसेंच आहे?

---

( ११९ ) कामक्रोधांचे पर्वत ओलांडता येत नसल्यामुळें मला पांडुरंग अंतरला आहे.

**कामक्रोध आड पडले पर्वत । राहिला अनंत पलीकडे ॥**
**नुलंघवे मज न सापडे वाट । दुस्तर हा घाट वैरियाचा ॥**
**आता कैंचा मज सखा नारायण । गेला अंतरोन पांडुरंग ॥**
**तुका म्हणे व्यर्थ मोलाचें शरीर । गेलें हा विचार कळो आला ॥**

कामक्रोधांचे पर्वत आड आल्यामुळें देव पलीकडेच राहिला आहे. हे पर्वत मला ओलांडतां येत नसल्यामुळें अजून मला देवाची वाटच सांपडली नाहीं. ईश्वरमार्गांत आड येणाऱ्या या वैऱ्यावर चढाई केली पाहिजे. परंतु विजयी होणें कठीण दिसतें. आतां देव माझा सखा होणें शक्य दिसत नाहीं. तो मला कायमचा अंतरला असें दिसतें. हें बहुमोल आयुष्य मीं व्यर्थ घालविलें असें दिसूं लागलें आहे.

---

( १२० ) लोकांचे गुणदोष, पापपुण्य, नष्टदुष्टपण, यांचा कशास विचार करूं? माझ्यांत अधिक दोष असून मीं देवाला लांब केलें आहे.

**कासया गुणदोष पाहों आणिकांचें । मज काय त्यांचें उणें असे ॥**
**काय पापपुण्य पाहों आणिकांचे । मज काय त्यांचे उणें असे ॥**
**नष्टदुष्टपण कवणांचें वाणूं । तयाहून अणु अधिक माझें ॥**
**कुचर खोटा मज कोण असे आगळा । तो मी पाहें डोळां आपुलिये ॥**
**तुका म्हणे मी भांडवलें पुरता । तुजसी पंढरीनाथा लाावियेलें ॥**

आगळा—अधिक.

माझ्यामध्यें पुष्कळ दोष आहेत. आणखी दुसऱ्यांच्या गुणदोषांची चर्चा कशाला करूं ! मी अनेक पापें करीत असल्यामुळें दुसऱ्यांच्या पापांकडे बोट दाखविण्याचा मला काय अधिकार आहे ! दुसऱ्यांच्या दुष्टपणाचें वर्णन मी काय म्हणून करावें ! त्यांच्यापेक्षां थोडा अधिकच नष्टपणा मज-जवळ आढळेल. माझ्यापेक्षां जो अधिक कुचर व खोटा असेल तो मला डोळ्यांनीं पहावयाची इच्छा आहे. असा कोणी पहावयास मिळणार नाहीं. देवा, अशा खोट्या व वाईट गोष्टींचा सांठा मजजवळ भरपूर आहे. तो सर्व तुझ्यापुढें ठेविला आहे.

---

( १२१ ) माझें मन जर पूर्ण शुद्ध असतें तर लोकांनीं माझी निंदा केली नसती.

**चंदनाच्या वासें धरितील नाक । नावडे कनक न घडे हें ॥**
**साकरेची गोडी सारखी सकळां। थोरां मोठ्यां बाळां धाकुटियां॥**
**तुका म्हणे माझें चित्त शुद्ध होतें । तरी कां निंदितें जन मज ॥**

चंदनाचा वास शुद्ध असतो. तो टाळण्याकरितां कोणी नाक धरतील असें होणार नाहीं. तसें सोनें शुद्ध असतें तें कोणास आवडत नाहीं असें नाहीं. लहान थोरांस साखर गोडच लागते. ( या दाखल्यांवरून हें उघड आहे कीं ) माझें चित्त शुद्ध असतें तर लोकांना माझी निंदा करण्याची इच्छा कशी झाली असती !

---

( १२२ ) भाव, शुद्ध चित्त, भूतदया, गुरुदास्य, संतसेवन, जप, तप, तीर्थ, अनुष्ठान, वैराग्य, वनसेवन, इंद्रियनिग्रह वगैरे मजजवळ कांहीं नाहीं, म्हणून मी शरण आलों आहें.

**माझा तंव खुंटला उपाव । जेणें तुझे आतुडती पाव ॥**
**करूं भक्ति तरी नाहीं भाव । नाहीं हातीं जीव कवणेविशीं॥**
**धर्म करूं तरि नाहीं चित्त । दान देऊं तरि नाहीं वित्त ॥**
**नेणें पुजों ब्राह्मण अतीत । नाहीं भूतदया पोटा हातीं ॥**

नेणें गुरुदास्य संतसेवन । जप तप अनुष्ठान ॥
नव्हे वैराग्य वनसेवन । नव्हे दमन इंद्रियांसीं ॥
तीर्थ करुं तरि मन नये सवें । व्रत करूं तरि विधि नेणें स्वभावें॥
देव जरि आहे ह्मणों मजसवें । तरि आपपरावें न वंचे ॥
ह्मणोन आलों शरणागत । तुझा दास मी अंकित ॥
यास कांहीं न लगे संचित । जालों निश्चित तुका म्हणे ॥

ज्यामुळें तुझे पाय मिळतील असे उपाय मला साधले नाहींत. तुझी भक्ति करावी तर भाव राहात नाहीं व माझ्या जीवशक्ति कोणत्याही रीतीनें माझ्या ताब्यांत नाहींत. धर्म करावा तर त्याकडे चित्त नाहीं. दान द्यावें तर जवळ पैसा नाहीं. गरीब, ब्राह्मण, अतिथि यांचें पूजन करावें, तर पोटामागें लागल्यामुळें मजजवळ भूतदया नाहीं. गुरूची सेवा, संतांचा समागम, जप, तप, अनुष्ठान, हें कांहीं घडलें नाहीं. रानांत जाऊन राहतां येत नाहीं, संसार सोडतां येत नाहीं, किंवा इंद्रियें ताब्यांत ठेवितां येत नाहींत. तीर्थयात्रा कराव्या तर मन बरोबर येत नाहीं. घरींच राहावें, व्रतें करावीं, तर त्यांचे विधि योग्य रीतीनें होत नाहींत. देव जवळच आहे तेव्हां वरील साधनें करावयास नकोत असें म्हणावें, तर हें माझें व हें दुसऱ्याचें या भावना गेलेल्या नाहींत. याकरितां मी शरण येऊन तुझा दास झालों. यास कांहीं पुण्यसंचय लागत नाहीं, म्हणून मीं हा निर्धार केला आहे.

---

## साधन-सिद्धि

( १२३ ) ज्यांना हरी मनापासून आवडतो त्यांच्या भेटीची आतुरता मला आहे.

माझिये जातीचें मज भेटो कोणी । आवडीची धणी फेडावया ॥
आवडे ज्या हरि अंतरापासूनि । ऐसियाचे मनीं आर्त माझें ॥
तयालागीं जीव होतो कासावीस । पाहातील वास नयन हे ॥
सुफळ हा जन्म होईल तथून । देतां आलिंगन वैष्णवांसी ॥
तुका म्हणे तो चि सुदिन सोहळा । गाऊं या गोपाळा धणीवरी ॥

**वास—वाट, राहाण्याचें ठिकाण, वस्ती. धणी—समाधान, तृप्ति.**

माझ्या जातीचे लोक मला भेटले म्हणजे माझी हौस फिटेल. ज्यांना देवाची आवड अंतःकरणापासून आहे त्यांना भेटण्यास माझें मन आतुर आहे. त्यांच्याकरितां माझा जीव खालींवर होतो व माझे डोळे त्यांची वस्ती हुडकीत असतात. वैष्णवांना आलिंगन देण्यास मिळालें म्हणजे माझ्या जन्माचें सार्थक होईल. वैष्णवांसमवेत देवाचें कीर्तन मनाचें समाधान होईपर्यंत करावयास मिळालें कीं तो दिवस चांगला दिवस होय व तो चांगला सुखाचा योग होय.

---

(१२४) देवाच्या सामर्थ्यानें संसाराची चिंता दूर करूं.

**करूं याची कथा नामाचा गजर। आम्हां संवसार काय करी॥**
**म्हणवूं हरिचे दास लेऊं तीं भूषणें। कांपे तया भेणें कळिकाळ॥**
**आशा भय लाज आड नये चिंता। ऐसी तया सत्ता समर्थाची॥**
**तुका म्हणे करूं ऐसियांचा संग। जेणें नव्हे भंग चिंतनाचा॥**

कथा आणि नामाचा गजर करूं. मग संसारामुळें आमचा विनाश कसा होईल! हरिचे दास होऊन हरिदासांचीं भूषणें घालूं. त्यांच्या दर्शनानें कालि व काळ कापूं लागतात. आशा, भय, चिंता इत्यादि आड येत नाहींत. देवाची सत्ता यांना घालविण्यास समर्थ आहे. ज्यांच्या संगतींत ईश्वरचिंतनाचा भंग होणार नाहीं अशा लोकांचीच संगती धरूं.

---

(१२५) ज्यांची बोलण्याप्रमाणें करणी असते त्यास देव मानून मी त्यांचा किंकर होईन.

**बोले तैसा चाले। त्याचीं वंदीन पाउलें॥**
**अंगें झाडीन अंगण। त्याचें दासत्व करीन॥**
**त्याचा होईन किंकर। उभा ठाकेन जोडोनि कर॥**
**तुका म्हणे देव। त्याचे चरणीं माझा भाव॥**

स्वतःच्या बोलण्याप्रमाणें ज्याचें वागणें आहे त्याच्या पावलांना मी वंदन करीन. त्याच्या घरचें अंगण झाडण्याचें काम करीन. त्यांच्या हुकुमांत राहीन. इतकेंच काय त्याच्यापुढें नेहमीं हात जोडून गुलामाप्रमाणें उभा राहीन. तो मनुष्य मला देवाप्रमाणें होय. मी त्याची भक्ति करीन.

---

( १२६ ) मी निंदा, सन्मान, देहभोग, यांना देवाचे चरणीं अर्पण करितों.

**निंदी कोणी मारी । वंदी कोणी पूजा करी ॥**
**मज हें ही तें ही नाही । वेगळा दोही पासूनी ॥**
**देहभोग भोगें घडे । जें जें जोडे तें तें बरें ॥**
**अवघें पावे नारायणीं । जनार्दनीं तुकयाचें ॥**

कोणी मला निंदतात, कोणी मारतात, कोणी नमस्कार करितात, आणि कोणी माझी स्तुति करितात. माझें दोहोंकडेही लक्ष नाहीं. मी दोघांपासून वेगळा आहें. आपल्या पूर्वकर्माप्रमाणें देहाला भोग मिळतात. म्हणून मिळालेल्या भोगांना बरे म्हटलें पाहिजे. तुका सर्व देवाकडे पावते करतो.

---

( १२७ ) मनांतून मोह आणि आशा गेल्यामुळें मुंगी व राव, सोनें आणि माती, हीं आम्ही मनानें सारखीं मानितों.

**मुंगी आणि राव । आम्हां सारखाची जीव ॥**
**गेला मोह आणि आशा । कळिकाळाचा हा फांसा॥**
**सोनें आणि माती । आम्हां समान हें चित्तीं ॥**
**तुका म्हणे आलें । घरा वैकुंठ सगळें ॥**

मुंगी व राजा यांचा जीव एकाच योग्यतेचा असें मी समजतों. मला आतां कशाचाही मोह नाहीं व कसली वासनाही नाहीं. मोह आणि वासना हे कलि आणि काळ यांचे फांसे आहेत. सोनें व माती यांना माझ्या चित्तांत एकच किंमत आहे. कारण माझ्या घरांत सर्व स्वर्गसुखें आहेत. ( सर्व वैकुंठ माझे घरीं आलें आहे.)

---

( १२८ ) मी सुखदुःख समान मानतों; व कोणत्याही स्थितीस सादर असतों.

कैं वाहावें जीवन । कैं पलंगीं शयन ॥
जैसी जैसी वेळ पडे । तैसें तैसें होणें घडे ॥
कैं भोज्य नानापरी । कैं कोरड्या भाकरी ॥
कैं बसावे वाहनी । कैं पायीं अनवाणी ॥
कैं उत्तम प्रावर्णें । कैं वसनें तीं जीर्णें ॥
कैं सकळ संपत्ती । कैं भोगणें विपत्ती ॥
कैं सज्जनाशीं संग । कैं दुर्जनाशी योग ॥
तुका म्हणे जाण । सुखदुःख तें समान ॥

आम्ही कधीं आमच्या जीवनाचें सामान स्वतः वाहून नेतों, कधीं पलंगावर निजून राहातों. जसा जसा प्रसंग येतो त्याप्रमाणें आमचें वर्तन असतें. कधीं पंचपक्वान्नांचें भोजन करतों, तर कधीं कोरड्या भाकरी खातों. कधीं पालखींत बसून जातों, तर कधीं अनवाणी चालतों. कधीं उत्तम वस्त्रें अंगावर घेतों, तर कधीं जीर्ण कपडे घालतों. कधीं संपन्न स्थितींत असतों, तर कधीं विपत्तीला तोंड देतों. कधीं सज्जनांच्या संगतींत असतों, तर कधीं दुर्जनाशीं संबंध ठेवावा लागतो. आम्हांला लौकिक सुख व दुःख हीं सारखींच आहेत.

---

( १२९ ) आम्ही विष्णुदास मायबापाहून मायावंत असतों किंवा शत्रूला शोभणार नाहीं असा घातपात करतों.

मऊ मेणाहून आम्ही विष्णुदास । कठिण वज्रास भेदूं ऐसें ॥
मेले जित असों निजोलिया जागे । जो जो जें जें मागे तें तें देऊं ॥
भले तरि देऊं गांडीची लंगोटी । नाठाळाचे काठी देऊं माथां ॥
मायबापाहूनि बहु मायावंत । करूं घातपात शत्रूहूनि ॥
अमृत तें काय गोड आम्हांपुढें । विष तें बापुडें कडू किती ॥
तुका म्हणे आम्ही अवघे चि गोड । ज्याचे पुरे कोड त्याचेपरि ॥

आम्ही ( भागवत पंथाचे ) देवाचे भक्त मेणापेक्षांही मऊ असतों व वज्रासारख्या अत्यंत कठीण अशा इत्याराचा भेद करण्याइतकें कठीण असतों. आम्ही विषयसेवनाच्या दृष्टीनें मेल्यासारखे दिसलों तरी आत्मज्ञानाच्या दृष्टीनें जिवंत असतों. व जगांतील व्यवहाराच्या दृष्टीनें निजल्यासारखे दिसलों तरी आत्महिताकरितां जागे असतों. ज्या प्रकारच्या वर्तनाची मागणी होते, त्या प्रकारचें वर्तन आम्ही ठेवतों. भल्याशीं वागावयाचें असल्यास लंगोटी देखील देण्यास आम्ही तयार असतों; पण नाठाळाबरोबर वागावयाचें असल्यास त्याच्या डोक्यांत काठी मारण्यासही तयार असतों. आईबाप करणार नाहींत इतकी माया आम्ही करतों, व शत्रूही करणार नाहीं इतका घातपातही आम्ही करतों. आमचें वागणें अमृतापेक्षां गोड असतें, किंवा विषाचा वाईटपणा आमच्यापुढें फिकाच पडतो. आम्ही वास्तविक गोडच आहों. परंतु ज्यांची जशी मागणी तशी त्यांची आवड आम्ही पुरवितों.

---

## साक्षात्काराकरितां तळमळ

( १३० ) सासरीं गेलेली मुलगी, चुकलेलें मूल व पाण्याबाहेर पडलेला मासा, याप्रमाणें माझा जीव देवाकरितां तळमळत आहे.

**कन्या सासुऱ्यासी जाये। मागें परतोनी पाहे॥**
**तैसें जालें माझ्या जिवा। केव्हां भेटसी केशवा॥**
**चुकलिया माये। बाळ हुरू हुरू पाहे॥**
**जीवना वेगळी मासोळी। तैसा तुका तळमळी॥**

**जीवन**—पाणी.

सासरीं गेलेली मुलगी मागील ( माहेर केव्हां भेटेल अशी ) आठवण करीत असते. त्याप्रमाणें माझ्या जिवाला आपलें मूळ ठिकाण जो देव त्यास केव्हां भेटेन असें झालें आहे. आईपासून चुकलेलें मूल आईला जसें उत्कंठेनें शोधीत असतें, पाण्याबाहेर काढलेला मासा जसा तळमळत असतो, तसा देवापासून दूर असल्यामुळें मी तळमळत आहें.

---

( १३१ ) देवाशिवाय माझ्या जीवास समाधान नाहीं.

मातेविण बाळा । आणिक न माने सोहळा ॥
तैसें जालें माझ्या चित्ता । तुजविण पंढरिनाथा ॥
वाट पाहे मेघा बिंदु । नेघे चातक सरिता सिंधू ॥
सारसांसी निशीं । ध्यान रवीच्या प्रकाशीं ॥
जीवनाविण मत्स्य । जैसें धेनूलागीं वत्स ॥
पतिव्रते जिणें । भ्रताराच्या वर्तमानें ॥
कृपणाचें धन । लोभालागीं जैसें मन ॥
तुका म्हणे काय । तुजविण प्राण राहे ॥

सोहळा—आनंदाचा प्रसंग. सरिता—नदी. सिंधू—समुद्र.
सारस—कमळ. निशीं—रात्रीं.

मातेपासून दूर झालेल्या बाळाला मातेशिवाय दुसरे सोहळे पुष्कळ असले तरी आवडत नाहींत. त्याप्रमाणें तुझ्याशिवाय माझी स्थिति होते. चातक समुद्राचे किंवा नद्यांचें पाणी न घेतां मेघाच्या बिंदूची वाट पहातो. सर्व रात्रभर कमळांना सूर्योदयाचें ध्यान असतें. माशाची स्थिति पाण्यावाचून जशी होते, गायीचें वासरूं गायीकरितां जसें घाबरतें, पतिव्रतेचा जीव भ्रताराच्या वर्तमानाकरितां जसा होत असतो, कृपणाचें मन धनाकरितां जसें होत असतें तसें मला होतें. तुझ्याशिवाय माझा प्राण कसा राहावा !

---

( १३२ ) माझी वाणी, देह व मन यांचें सूत्र ईश्वराच्या हातांत आहे.

प्रेमसूत्र दोरी । नेतो तिकडे जातों हरी ॥
मनेंसहित वाचा काया । अवघें दिलें पंढरीराया ॥
सत्ता सकळ तया हातीं । माझी कींव काकुलती ॥
तुका म्हणे ठेवी तैसें । आम्हीं राहों त्याचे इच्छे ॥

देव प्रेमाच्या सूत्रानें जिकडे नेतो तिकडे मी जातों. कारण वाणी, शरीर व मन हीं सर्व मी देवाच्या स्वाधीन केलीं आहेत. आतां यांच्यावरची

सर्व सत्ता त्याजकडे आहे. माझी कींव व काळजी त्यास आहे. देव ज्या स्थितींत ठेवील त्या स्थितींत त्याच्या इच्छेनुरूप आम्ही राहूं.

---

( १३३ ) देव जें जें करतो तें माझ्या हिताचें करतो, अशी प्रचीति मला आली आहे.

**याती मतिहीन रूपें लीन दीन । आणीक अवगुण जाणोनियां ॥**
**केला त्या विठ्ठलें माझा अंगीकार। ऐसा हा विचार जाणोनियां ॥**
**जें कांहीं करितो तें माझें स्वहित। आली हे प्रचित कळों चित्ता ॥**
**जालें सुख जीवा आनंद अपार । परमानंदें भार घेतला माझा ॥**
**तुका म्हणे यासी नांवाचा अभिमान । ह्मणोनि शरण तारी बळें ॥**

मी जातीनें व बुद्धीनें कमी प्रतीचा, रूपानें ओंगळ, इत्यादि अनेक दोष माझ्यामध्यें आहेत. हें ठाऊक असून देवानें माझा अंगीकार केला हें सर्व त्यानें जाणूनबुजून केलें. जें माझ्या हिताचें तें देव घडवून आणतो याबद्दल माझ्या मनाची खातरी झाली. आनंदाचें श्रेष्ठ स्थान जो देव त्यानें माझा भार घेतला आहे, याबद्दल खातरी झाल्यामुळें मला अपार आनंद झाला आहे. देवाला आपल्या कृपासागर व पतितपावन या नांवाचा अभिमान असल्यामुळें जे त्याला शरण जातात त्यांना तो तारतो.

---

( १३४ ) पाणी आणि मीठ, अग्नि आणि कापूर यांप्रमाणें तूं आणि मी समरस झालों आहों.

**लवण मेळवितां जळें । काय उरलें निराळें ॥**
**तैसा समरस जालों । तुजमाजीं हरपलों ॥**
**अग्निकर्पुराच्या मेळी । काय उरली काजळी ॥**
**तुका म्हणे होती । तुझी माझी एक ज्योती ॥**

पाण्यांत मीठ विरघळविलें म्हणजे तें काय निराळें राहातें ? तें निराळें राहात नाहीं. त्याचप्रमाणें मी तुझ्या रसांत विरघळून नाहींसा झालों आहें.

(वेगळा राहिलों नाहीं.) कापराचा व अग्नीचा संसर्ग झाला म्हणजे सर्व कापूर अग्निमय होतो. (काजळी राहात नाहीं.) त्याप्रमाणें तुझी आणि माझी ज्योती, देवा, एकच होत आहे. (ती पूर्वीं एकच होती.)

---

## सामर्थ्य व आनंद

(१३५) माझ्या अंगापासून देव वेगळा करतां येणार नाहीं.

**रवि रश्मिकळा । नये काढितां निराळा ॥**
**तैसा आम्हा जाला भाव । अंगीं जडोनि ठेला देव ॥**
**गोडी साकरेपासुनी । कैसी निवडती दोन्ही ॥**
**तुका म्हणे नाद उठी । विरोनि जाय नभा पोटीं ॥**

सूर्य आणि सूर्याचीं किरणें वेगळीं करतां येत नाहींत; त्याचप्रमाणें आमची वृत्ति झाली आहे. देव आमच्या अंगाशीं जडून राहिला आहे. गोडी आणि साखर या वेगवेगळ्या कशा करितां येतील ? आवाज आकाशामुळें उत्पन्न होतो पण तो स्वतंत्र न राहातां आकाशांतच विरून जातो.

---

(१३६) देवाशीं लीन झाल्यामुळें आम्ही समर्थ झालों आहोंत.

**जालों बळिवंत । होऊनियां शरणागत ॥**
**केला घरांत रिघावा । ठायीं पाडियेला ठेवा ॥**
**हातां चढे धन । ऐसे रचलें कारण ॥**
**तुका म्हणे मिठी । पायीं देऊनि केली लुटी ॥**

मी देवाला शरण गेलों पण त्यामुळें बलवान् झालों. त्याच्या घरांत शिरकाव करून घेतला व त्याचा ठेवा (त्याचें खरें तत्त्व) कोठें आहे त्याची माहिती करून घेतली. त्या ठेव्यांतील धन हस्तगत होईल असें कारण रचिलें. उच्चपदाप्रत नेणारीं साधनें हस्तगत करून घेतलीं. देवाच्या पायास मिठी घातली खरी परंतु आम्हीं त्याला पूर्ण लुटलें. (अनन्यभावें शरण गेलों व मोक्षसाधनरूप धन यथेच्छ लुटलें.)

---

REFBK-0005624
REFBK-0005624